# दत्तकिंकरांची कविता.

## भाग पहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. ३९९३
ता. ३१/८/३५
ठाणें.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २२०८

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

REFBK-0004488

द. अ. सराफ.

लेखकाकडून संग्रहालयास नजर असे

सन्मार्गदर्शक पुस्तकमालेचें १० वें पुस्तक.

# दत्तकिंकरांची कविता.

## भाग पहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत, ठाणें.

लेखक

दत्तात्रेय अनंत सराफ.

कंधारकर

REFBK-0004488

आवृत्ति पहिली. ] [ किं. १२ आणे.

मुद्रकः—
दामोदर रघुनाथ मित्र,
मनोरंजन छापखाना,
मुंबई नं. ४

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

प्रकाशकः—
गणेश अनंत सराफ,
मु. पो. नांदेड
( निजाम स्टेट )

# अनुक्रमणिका.


| क्रमांक. | नांव. | प्रकाशनस्थल. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | ईशस्तवन ... | आर्यविज्ञान... ... | १ |
| २ | श्रीसद्गुरुप्रार्थना ... | ... ... ... | २ |
| ३ | अभय याचना ... | गोग्रास ... ... | ३ |
| ४ | पूर्वजपदवंदनावलि ... | ... ... ... | ४ |
| ५ | श्रीशंकरास धोक्याची सूचना | गोग्रास ... ... | ७ |
| ६ | अशांची संगति नको | ... ... ... | ८ |
| ७ | श्री गौतमी स्तोत्र ... | गोग्रास ... ... | ८ |
| ८ | हिंदु कोण ... | ... ... ... | १० |
| ९ | श्री दत्तात्रयाष्टक ... | ... ... ... | १० |
| १० | पुढें कसें होणार ... | ... ... ... | १२ |
| ११ | काव्य देवतेस ... | ... ... ... | १३ |
| १२ | अभयदान ... | कविसंमेलन... ... | १४ |
| १३ | मंगलस्वप्न ... | ... ... ... | १६ |
| १४ | वेडें जग ... | ... ... ... | १९ |
| १५ | भाग्यशाली कोण ? ... | ... ... ... | १९ |
| १६ | अंगाई गीत ... | ... ... ... | २० |
| १७ | फोल तुझा अभिमान... | ... ... ... | २० |
| १८ | जगदवलोकन ... | ... ... ... | २१ |
| १९ | श्रीशिवप्रशस्ति ... | ... ... ... | २३ |
| २० | देवी अहल्या ... | ... ... ... | २५ |
| २१ | श्री पांडुरंग दर्शन ... | ... ... ... | २६ |
| २२ | महाजनप्रशस्ति ... | ... ... ... | २८ |
| २३ | मार्गप्रतीक्षा ... | ... ... ... | ३० |
| २४ | लोक वेडे कीं मी वेडा | ... ... ... | ३१ |

दत्तकिंकरांची कविता.


| क्रमांक | नांव. | प्रकाशनस्थल. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २५ | भगिनीस्मरण | ... ... ... ... | ३३ |
| २६ | सुशिक्षितांची डोळेझांक | आर्यविज्ञान ... ... | ३६ |
| २७ | विडीचें कृष्णकृत्य | ... ... ... ... | ३७ |
| २८ | शुकरंभा संवाद ( अर्वाचीन ) | ... ... ... | ३७ |
| २९ | धेनु आणि धूम्रपान ... | गोग्रास ... ... | ४४ |
| ३० | वेडीचा वेडा ... | विहंगमाला ... ... | ४६ |
| ३१ | प्रणयभंग | ... ... ... ... | ४७ |
| ३२ | निरोप | ... ... ... ... | ४८ |
| ३३ | सदा चहा प्याया | ... ... ... ... | ४९ |
| ३४ | माझें सामर्थ्य ... | मंदारपुष्पमाला ... | ५० |
| ३५ | मोठा कोण ? ... | आर्यविज्ञान ... ... | ५२ |
| ३६ | खंदा धर्मवीर ... | स्वधर्म ... ... | ५३ |
| ३७ | आर्यगृहिणी | ... ... ... ... | ५५ |
| ३८ | भिकारीण | ... ... ... ... | ५७ |
| ३९ | बळी तो कान पिळी ... | ... ... ... | ६२ |
| ४० | मना ! नको तो अभिमान | ... ... ... | ६३ |
| ४१ | यत्नमहति | ... ... ... ... | ६३ |
| ४२ | व्यर्थ तो | ... ... ... ... | ६५ |
| ४३ | पुष्प ! | ... ... ... ... | ६६ |
| ४४ | श्रेष्ठत्वाचा मार्ग ... | लोकमित्र ... ... | ६७ |
| ४५ | कोण कशानें तरले | ... ... ... ... | ६८ |
| ४६ | काळाचे बोल | ... ... ... ... | ६९ |

श्रीदत्त

# आत्मनिवेदन.

एकदा शाळेंत मिडलच्या वर्गांत असतांना आमचे पूज्य मरहूम राजे **मीर महबूब आलीखां** साहेब यांच्या वार्षिकोत्सवाचा दिवस **मुखेड** येथें मोठ्या समारंभानें साजरा केला गेला. त्या दिवशीं उर्दू व मराठी वाङ्मय-भक्तांनीं राजेसाहेबांच्या गुणानुवादपर कांहीं लिखाण तयार करून सभेमध्यें वाचावयास घेऊन येण्याचें ठरल्याप्रमाणें मराठी भाषेंतून आमचे गुरुवर्य श्री. **हरि नरहर मो**काशे हेडमास्तर यांनींहि कांहीं लिखाण तयार केलें होतें. ही गोष्ट अर्थात् मलाहि समजली; व त्या उत्सवांत ह्मणण्यासाठीं मीहि एक कविता तयार केली ती अशी:—

## श्लोक.

**राज्य चालवी आमुच्या वरी । प्रजा पालनीं दक्षता करी ।**
**देशि शांति या निशिदिनीं वसो । निजाम आमुचा सुखि सदा असो।**

आतांच्या दृष्टीनें अशुद्धच पण त्यावेळीं ही कविता मला चांगली वाटल्यामुळें मी आपल्या गुरुवर्यास दाखविली. त्यावेळीं माझें वय बारा वर्षांचें होतें. वर्गांतील कोणत्याच मुलाच्या डोक्यांत ही कल्पना आली नाहीं, आणि गुरु-वर्यांचें अनुकरण करण्याचें माझ्या एकट्याच्याच मनांत प्रथम आल्यामुळें त्यांनीं माझें कौतुकच केलें ! पण कोणास नसून मलाच कविता लिहिण्याची बुद्धि कां व्हावी, याचें कोडें मात्र मला अद्यापपावेतों उलगडत नाहीं !

एखाद्यास वयाची पासष्ट वर्षें उलटून गेलीं तरी एखाद्या विषयाचें अल्प-देखील ज्ञान होऊं नये आणि एखाद्यास अगदीं बालपणांतच त्या विषयाचें ज्ञान व्हावें, हें असें कां होतें ? याचें जें उत्तर, तेंच माझ्या संबंधानेंहि असावें, असें मला वाटतें. यास पाहिजे तर पूर्व जन्माची ठेव म्हणा, किंवा निसर्गाची कृपा ह्मणा.

यानंतर थोड्याच दिवसांनीं मी शाळेस रामराम ठोकून निघालों व उदर-निर्वाहाच्या उद्योगास लागलों. पण यावेळीं मला वर्तमानपत्रें, कादंबऱ्या, व

मासिक पुस्तकें इ. वाचण्याचा चांगलाच नाद लागला. त्यांत वाङ्मयद्वारें सेवा करीत असलेल्या विद्वान् लेखकांच्या कृतीप्रमाणें आपणहि कांहींशी अल्पस्वल्प "वाङ्मय-सेवा" करावी असें मला वाटूं लागलें. तदनुसार अगदीं प्रथम ह्मणजे यावेळीं **गुल**बर्गा येथें निघत असलेल्या "**गु**लबर्गासमाचार" नामक वर्तमानपत्रांत, मी **बोधन** येथें असतांना स्थानिक बातम्यासंबंधीं एक लेख लिहून पाठविला. तो संपादकानें आनंदानें आपल्या पत्रांत छापून प्रसिद्धहि केला.

हा लेख छापून येतांच माझ्या मनास बराच आनंद वाटला, व इतर प्रसिद्ध लेखकाप्रमाणें माझेंहि नांव वर्तमानपत्रांतून छापून आलेलें पाहून मीच स्वतःला धन्यता देऊं लागलों ! हा लेख किंवा हें कार्य कांहींच महत्त्वाचें नव्हतें हें जरी खरें तरी पण पुनः पुनः हा लेख लिहून वर्तमानपत्राकडे किंवा मासिकाकडे पाठविण्यास, या छापून आलेल्या लेखांमुळें मला जास्तच उल्हास वाटला हें वाचकांस सांगणें नकोच !

या नंतर थोड्याच दिवसांनीं मला श्रीक्षेत्र **मा**हूर येथें यात्रेस जाण्याचा योग आला. तेथून परत आल्यानंतर "श्रीक्षेत्र **मा**हूरवर्णन" या नांवाचा वर्णनात्मक एक लेख लिहून तो '**लो**कमित्र' मासिकाकडे पाठविला. तो संपादकांना फार पसंत पडून त्यांनींहि आपल्या मासिकांत छापून प्रसिद्ध केला.

यापुढें माझे "अशी मी कोण ?" "श्रीक्षेत्र उनपेश्वर" "शहासाहेब नांदेडकर" "सावधान" द्विजांना धूम्रपान योग्य आहे काय ?" इत्यादि लहान-सहान लेख ज्ञानमित्र, **लो**कमित्र, **गो**ग्रास, स्वधर्म इ. नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. या प्रसिद्धीमुळें माझा वाङ्मय-सेवेविषयींचा उल्हास वरचेवर वृद्धिंगत होऊं लागला.

गद्य-लेखनास थोडीच कां होईना पण प्रसिद्धि मिळाली. परंतु कवितारूपानें जनतेपुढें येण्याचा लाभ अद्याप मला मिळाला नव्हता. ह्मणून तद्विषयक प्रयत्न करून लागलींच 'ज्ञानाचा थोरपणा" व "श्री विश्वेशस्तवन" या दोन लहान कविता तयार करून अनुक्रमें **पुणें** येथील "ज्ञानमित्र" व "**विश्व**-ब्रह्मवृत्त" या दोन मासिकांकडे पाठविल्या त्या त्यांतून प्रसिद्ध देखील झाल्या.

पुणें शहरासारख्या ठिकाणच्या मासिकांतून माझी कविता प्रसिद्ध होण्याचें यश मला लाभल्यामुळें गद्य व पद्य या दोन्ही बाजूंनीं वाङ्मयसेवा करण्याकडे

माझें मन साहजिकच वळत चाललें. कारण, आपला बुद्धिप्रभाव वाढवून, अनोळखी सज्जनांचा परिचय करून घेण्यास, व आपलीं मतें जनतेच्या कानावर घालून, "जितके कांहीं आपणास ठावें। तितकें इतरांस सांगावे।" या समर्थांच्या उक्त्यानुसार जनतेस सन्मार्गाकडे वळविण्यास आणि गरिबाच्य झोंपडीपासून तों थेट राजांच्या राजमहालांपर्यंत प्रवेश करता येण्याचें सुलभ साधन म्हणजे "वाङ्मय–सेवा" च होय. इतकेंच काय पण मरणोत्तरहि जिवंत राहण्याचा सरळ मार्ग ह्मणजे "वाङ्मय–सेवा" च होय. अशी माझी प्रामाणिक समजूत झाली. त्या दिवसापासून वाङ्मयसेवेचें मला पक्कें वेड लागलें!

सारांश वाङ्मोहिनीनें माझ्या कंठास आपल्या कोमलकरांनीं घट्ट मिठी मारल्यामुळें मी साहजिकच तिच्या मोहपाशांत सांपडलों यांत नवल तें काय?

या मोहिनीच्या जाळ्यांत सांपडून मी आतां पावेतों "श्री पूर्णानंदस्वामींचें चरित्र, श्री शारदा स्तोत्र, श्री तुकाराम महाराज चरित्र, धूम्रपाननिषेध–पद्यावलि, मुंबईची मौज, श्री गोदाष्टक, श्री सद्गुरु भजनामृत" इत्यादि स्वतंत्र पुस्तकें लिहिलीं. तीं छापून देखील वाङ्मयभक्तांच्या अवलोकनांत आलेलींच आहेत. याशिवाय आर्यविज्ञान, गोग्रास, स्वधर्म, विहंग माला, इ. पत्रांतून देखील माझ्या बऱ्याच स्फुट कविता छापून प्रसिद्ध झाल्या आहेत; तेव्हां त्यांच्या गुणावगुणासंबंधानें मी या ठिकाणीं दिग्दर्शन करण्याचें कारणच नाहीं.

या माझ्या वाङ्मयसेवेच्या सततोद्योगामुळें व वरील पुस्तकें प्रसिद्ध झाल्यामुळें इतराचे लेख व कविता देखील शुद्धीकरणासाठीं मजकडे येऊं लागल्या! इतकेंच काय पण, प्रतिष्ठित अशा लोकमित्राच्या संपादकांनीं देखील आपली कुळदेवता जी "श्री ह्माळसादेवी" तिच्या स्तवनपर कांहीं कविता तयार करून देण्यासाठीं मला आज्ञा केली. ती त्यांची आज्ञा मान्य करून मीं कांहीं कविता लिहून त्यांच्याकडे पाठविल्या. त्या त्यांनां फारच फार आवडून त्यांनीं "श्री ह्माळसा कृपामृत" या नांवाचें स्वतंत्र पुस्तकच ह्मणून स्वतःतर्फे नुक्तेंच छापून प्रसिद्ध केलें आहे! आणि याच वाङ्मय–सेवेच्या बळावर श्री. डॉ. केतकरांच्या नेतृत्वाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या "विद्यासेवक" सारख्या भारदस्त मासिक पुस्तकांतून मला "माझा आर्थिक वृत्तांत" या नांवाच्या लेखास जागा मिळून जनतेस, सततोद्योगाचा मार्ग मला दाखविता आला!

## दत्तकिंकरांची कविता.

कोणतीहि कविता किंवा लेख इ. वाङ्मय निर्माण करावयाचें तर त्यापासून वाचकांस कांहींतरी तत्त्वज्ञान मिळून त्यांचें कल्याण झालें तरच त्याचें सार्थक होय, असें मला वाटतें. या ध्येयास अनुसरूनच मी आपल्या कविता लिहीत असून त्यांपैकींच कांहीं कवितांचा संग्रह वाचकांपुढें ठेविला जात आहे.

धडधडीत होणाऱ्या नित्यशःच्या गोवधाची चीड वाटून श्रीशंकर व श्रीदत्तात्रेय या देवतांना देखील दिलेली " धोक्याची सूचना " व हे देवसुद्धां या गोष्टीची कांहींच व्यवस्था करीत नाहींत, हें पाहून गाईचा पालनकर्ता जो श्रीकृष्ण त्याकडे केलेली " अभययाचना " इ. कवितांवरून वाचकांच्या मनांत पूज्य गोमातेविषयीं कळकळ उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. " श्रीशिव-प्रशस्ति, देवी अहल्या, श्री. दे. ल. महाजन इ. च्या वर्णनात्मक कविता; थोरांची कर्तबगारी किती थोर असते, याची साक्ष पटून वाचकांना कार्यतत्पर केल्यावांचून राहणार नाहींत. शिथिल झालेली धर्मभावना " खंदा धर्मवीर " ही एकच कविता वाचकांची धर्माभिनिवेश प्रदीप्त करील.

अलीकडे व्यायाम, आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, इत्यादि पुष्कळसें वाङ्मय दृष्टीस पडतें, परंतु दुर्व्यसन-निषेधात्मक वाङ्मयाचा मात्र बराच अभाव दिसतो! आजकाल लहान अशिक्षित गरिबांपासून तों थेट थोर सुशिक्षित, पदवीधर, शास्त्री, पंडित डॉक्टर, वैद्य, नेते, पुढारी इ. विद्वान् व प्रतिष्ठित म्हणविणाऱ्या तेजस्वी सूर्यचंद्रांना देखील चहा व विडी-सिगारेट सारख्या क्षुल्लकच पण, देह व द्रव्यविध्वंसक अशा दुष्ट व्यसनरूपी राहूकेतूंनीं ग्रासून टाकलें आहे! परंतु अशा व्यसनापासून परावृत्त होण्याविषयींचा प्रयत्न मात्र फारच अल्प प्रमाणांत होत असतो. आणि असें दुर्व्यसन-निषेधात्मक वाङ्मय लिहिण्याकडेहि कोणाची प्रवृत्ति होत नाहीं.

खरोखर पाहिलें असतां चोहोंबाजूंनीं राष्ट्रोन्नतीचा मार्ग म्हणजे, समाजांतील दुर्व्यसनें काढून टाकून त्यांच्यांत प्रत्येक गोष्टीसंबंधानें जागृति उत्पन्न करणें हाच होय. व हेंच प्रथमतः केलें पाहिजे. परंतु इकडे दुर्लक्ष झाल्यामुळें, बुडास कीड लागलेल्या झाडाच्या वरच्या फांद्यांना नित्यशः पाणी देण्यासारखेंच आहे.

ही गोष्ट कांहीं अंशीं माझ्या लक्षांत आल्यामुळें मीं प्रथम दुर्व्यसन सोपानांतील अगदीं पहिल्या पायरीकडे म्हणजे विडी-सिगारेटच्या व्यसनाकडे

लक्ष्य पोंचवून समाजांतील ही घाण अगोदर नाहींशीं व्हावी म्हणून बऱ्याच दिवसांपासून प्रयत्न चालविला. स्वधर्म, गोग्रास इ. पत्रांतून लेख लिहून व वेळोवेळीं सभेंतून व्याख्यानें देऊन आणि धूम्रपान निषेध इत्यादि पुस्तकांच्या द्वारें जनतेस या क्षुल्लकच पण राष्ट्राची भयंकर हानी करणाऱ्या व्यसनाची जाणीव करून दिली आहे, हें सर्वांस विदितच आहे.

या माझ्या ध्येयास अनुसरूनच ( गोग्रास, आर्यविज्ञान, इ. पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या ) मी अगदीं निर्भिडपणानें स्फुट कविता देखील लिहिल्या आहेत. हें " धेनु आणि धूम्रपान " " सुशिक्षितांची डोळेझांक " इत्यादि विडीनिषेधात्मक कवितांवरून वाचकांचें लक्ष्यांत येईलच.

अशा तऱ्हेचीं कार्यें इतर मार्गापेक्षां केवळ वाङ्मयसेवेनेंच उत्तम प्रकारें करितां येतात हें " माझें सामर्थ्य " या कवितेनें दर्शविलेंच आहे.

माझ्या सांगण्याचा इत्यर्थ इतकाच कीं कोणत्याहि वाङ्मयसेवकानें–लेखक व कवीनें–राष्ट्राला पोषक व हितकारक असेंच एखादें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून तत्प्रीत्यर्थ आपलें वाङ्मय निर्माण करावें. मग तें ध्येय राजकीय, सामाजिक, धार्मिक इ. कोणत्याहि प्रकारचें असलें तरी हरकत नाहीं.

आजकाल इतर कोणत्याहि विषयापेक्षां शृंगारविषयक काव्याकडेच नूतन कविमंडळाचा ओघ ज्यास्त दिसून येत आहे. आणि तरुण रसिकांना पाश्चात्य–वाङ्मयपरिचयानें शृंगारिक विषयावरीलच कविता ज्यास्त आवडूं लागल्या आहेत. पण नैसर्गिक दृष्ट्या मनुष्यमात्राचा ओढा विषयासक्त होण्याचाच असल्यामुळें विषयासक्तींत भर घालणाऱ्याच कविता लिहिणें म्हणजे राष्ट्राला खड्डयांत ढकलण्यासारखेंच आहे ! कारण केंव्हांहि मनाला विषयापासून परावृत्त करून व दुर्व्यसनबंधनातून मोकळे होऊन स्वस्वरूपाची ओळख करून घेणें हेंच आपल्या श्रेष्ठ म्हणविणाऱ्या आर्यांचें श्रेष्ठ कर्तव्य होय. याची जाणीव तरुण वाङ्मय-सेवकांना करून दिल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. निदान माझें तरी या बाबतींत असेंच स्पष्ट मत आहे.

अलीकडे निर्यमक कविता करण्याचें एक बंडच माजत चाललें आहे. पण हें मला प्रशस्त वाटत नाहीं. आपल्या मनांतील भावना वाचकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं स्पष्ट यमकांच्या यातनेंत पडून आपल्या भावनांच्या स्पष्टतेंत विघ्न आणूं नये, असें या निर्यमक कविता करणारांचें मत आहे. मी असें विचारतों

कीं, जर तुम्हांस आपली भावना वाचकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं ( यमकें साधूनहि ती भावना कवितेमध्यें मांडतां येत नसेल तर ) खुशाल गद्य लिखाण कां लिहीत नाहींत ? मग अक्षरें, गण, मात्रा इत्यादिकांच्या यांचनेंत तरी कां पडतां ? अक्षरें, गण, मात्रा, इ. सर्व नियम जर पाळावयाचें तर मग एकट्या यमकानेंच काय तुमचें घोडें मारिलें ? असो. सध्यांच्या स्वातंत्र्यप्रिय युगांत इतर गोष्टीप्रमाणें काव्याच्या बाबतींतहि अशीं बंधनें तोडणें साहजीकच आहे, त्यास उपाय काय ?

प्रस्तावनेच्या बाबतींतहि अलीकडे बराच मतभेद झालेला दिसतो ! कोणास आपल्या लिखाणाबद्दल प्रस्तावनाद्वारें एखाद्या मोठ्या पदवीधराकडून प्रशंसा करून घ्यावीशी वाटते; तर कोणास आपल्या पुस्तकाबद्दल आपण आपलें हृद्गत कथन करणें योग्य वाटतें. यापैकीं, " ज्याच्या पुस्तकाबद्दल त्यानें आपलें हृद्गत सांगावें " हेंच मला ज्यास्त योग्य वाटतें. म्हणूनच मीं वाङ्मय-सेवेबद्दलचे आपले कांहीं विचार वाचकांपुढें ठेविले आहेत.

आतां मला एका अत्यंत आवश्यक अशा गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं, तो हा कीं, माझ्या आजपर्यंतच्या ज्या कविता तयार होऊन वेळोवेळीं नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या, त्याचें खरें श्रेय **नांदेड** येथील प्रसिद्ध कविवर्य **दे. ल. महाजन** यांनाच आहे. विद्यालयांतून प्राथमिक शिक्षणाचा जन्म घेऊन मी नुक्ताच काव्यांगणांत येऊन खेळूंबागडूं लागलों; अशाच वेळीं श्री. महाजन यांच्या सहवासाचा योग जुळून आला. निसर्गतः माझ्या हृदयभूमींत पडलेल्या काव्यवृक्षाचें बीजास त्यांनीं सहानुभूतिपर प्रेमाचें जीवन घालून त्या वृक्षास पुष्प-फलांची समृद्धि आणिली. हें कार्य त्यांनीं केलें नसतें तर मला काव्यांगणांतून दाराच्या बाहेर रसिकांना भेटावयास येण्याचें आजचें सामर्थ्य मुळींच आलें नसतें ! त्यांच्या या प्रेमपूर्ण कृपेबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

आतां माझ्या कवितेच्या चांगल्या वाईटपणाबद्दल मला कांहींच लिहावयाचें नसून मांडलेल्या ताटांतून ज्यांना जें जें पक्वान्न आवडेल तें तें सहजच ते सेवन करितील ही भावना ठेऊन मी रसिकांची रजा घेतों.

मु. नांदेड.<br>श्रीरामनवमी शके १८५३

आपला नम्र,<br>**दत्तकिंकर-कंधारकर.**

श्रीयुत

गुरुवर्य हरि नरहर मोकाशे.



माजी मुख्याध्यापक शाळा कसबे,
मुखेड, ता. कंधार, जि. नांदेड.

# अर्पण पत्रिका !

### आर्या.

शिक्षक वर्गामाजीं श्रेष्ठ, दयानिधि सुशील, श्रीमंत।
"हरि नरहर मोकाशे" गुरु तो खेळे मदीय हृदयांत।

शिशुपणिं शाळेमाजीं विद्यामृत पाजिलें जयें म्हणुनी।
वाङ्मय लोकीं, झालों अमर तयाचीच सत्कृपा वरुनी।

दावी कठोर मुद्रा वरिवरि परि मानसीं दया फार।
प्रेमें समस्त शिशुंतें वागवि, जणु कां स्वकीय तीं पोरं।

धैर्याचा, ज्ञानाचा, प्रेमाचा मूर्तिमंत पुतळाच।
विलसे निज प्रभेनें, लोकप्रिय जो वसे जगीं साच।

त्या मत्प्रिय गुरुकंठीं काव्याचा पुष्पहार गुंफोनी—।
प्रेमें अर्पण केला सेवा कांहीं तरी घडो म्हणुनी।

निज देश–धर्म–कार्यीं सेवा घडुनी यशस्वि जगिं व्हाया।
निज दत्तकिंकरातें देई आशीर्वचास गुरुराया ! ॥ १ ॥

---

## कवि-दत्तकिंकर.



[ दत्तात्रेय अनंत सराफ, कंधारकर ]

नांदेड.

Shri Datta Press Nander.

# दत्तकिंकरांची कविता.

## भाग पहिला.

### ईश-स्तवन !

( विबुधप्रिया )

मोद मानसिं वाटतो बहु आज त्वद्गुण गावया
अंत ना तव पार भो ! लव शक्य ना समजावया
वेदही गुण गाउनी अति थोर कीर्तिच वर्णिती
शेषही मनिं भागला; तरि त्यापुढें मग मी किती ? १

नामही तुज केशवा ! बहुधा न त्या मिति यादवा !
राम, विठ्ठल, बाहती कुणि विष्णु, शंकर माधवा !
ब्रह्म तो कुणि येशु तो कुणि बुद्धही कुणि जैन तो
बाहतो कुणि दत्तही परि एक ईश्वर भासतो २

ना कळे मज राघवा ! मतिहीन पामर मी खरा
आइ तूं प्रभुरायजी ! तव पाय हा मज आसरा ।
तारिले बहु भक्त तूं अशि थोर कीर्तिहि भूवरी-
वर्णिती, मग व्यर्थ कां करुं थोर काळजी मी तरी ? ३

होत ना उपकार वा करिं दान ना, परि पातकें-
होत हीं किति, जाहलीं किति, सर्व हीं तुज ठाउकें

पुण्य ना लव जाहलें अति गांजलों भव-सागरीं
यामुळें प्रभु तारि यांतुनि मुक्तता करि सत्वरीं ४
संत-संगति ही घडो तशि वासना तव भक्तिची
प्रार्थना तुज हीच गा ! प्रभु पूर्णता करि हेतुची
मानसीं निज कार्य जें नव चिंतिलें 'जन-सेवना'
त्यांत दे यश हे प्रभो ! मज बुद्धि देउनि वामना ! ५
षड्रिपू अति गांजिती वपु, नित्य लागुनि पाठिशीं
पीडितो भव केशवा ! लव लेश पुण्य न गांठिशीं
प्रेम मन्मनिं वाढवीं, मम दंभ सत्वरि ने लया ।
ब्रीद रक्षुनि आपुलें पदिं ठाव दे करुणालया ! ६
वासना जगिं अन्य ना तव पादुकांविण या मना
कामना करि पूर्ण ही, मज तारि रे ! रघुनंदना !
मस्तकीं कर ठेउनी वर देइ गा ! मम बांधवा-
सौख्य दे विनती अशी करि "दत्तकिंकर" माधवा ! ७

---

## श्रीसद्गुरु-प्रार्थना !

अभंग.

ज्ञान-सूर्य होसी । सद्गुरो ! आम्हांसी ।
अज्ञान-तमासी । दूर करी । १
असोनी डोळस । दिसेना डोळ्यास ।
दाखवी प्रकाश । गुरुराया ! । २
शीतल अज्ञान । लागे थंड जाण ।
सोडी बोध ऊन । दीनावरी । ३

उषःकाल झाला । झोंप लागे मला ।
फेंकी किरणाला । जागें करी । ४

देउनी प्रकाश । पाळितो विश्वास ।
दत्तकिंकरास । तोच पाळी ।

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ... नं. ...
ता. ...
ग्रं.

---

## अभय-याचना,

( आर्या. )

भारत भूवरि व्हावें, गोमातेचे परोपरी हाल
मोठें नवल गमे हें ! तुजविण देऊं प्रभो ! कुणा बोल ? १

खिल्लारें बहु होतीं, धेनूंची याच हिंद देशांत !
तेथें आज बघाया, ज्या थोड्या असति त्याहि दुःखांत २

धेनूसाठीं लढले, प्राण दिले कितिक हिंदु वीरांनीं
ते मेषपात्र बनले, देवा ! कळतें न ही तुझी करणी ३

'गोमाता' हें दैवत माझें, केवळ मदीय धर्माचें
त्या मातेचें दुःसह बघवेना दुःख होय तिज साचें ४

खाया मिळे न तृणही देई कुणि ना प्रसंगिं तिज पाणी
हाल कितीही झाले, तरी वदाया नसे जिला वाणी ५

निर्दय खाटिक वधिती, कंठ जिचा चराचर करें चिरुनी
दुःसह दुःख बघूनी, नयें तुला कां दया तरी अजुनी ६

जी कामधेनु जगतीं, शांतीस जिच्या पहा नसे पार
कारण सोसुनि दुःखें, स्वयें जनांलागिं देत सुख फार ७

शांतीचा मोबदला मिळत तिला योग्य हाच काय बरें ?
कीं दुग्ध देउनीयां, कंठी उलटा सुरा फिरावा रे ! ८

विपरीत जगतिं होणें, तुझिया कीर्तीस काळिमा आहे
कीं असुनि तूं दयाळू, निर्दय होशी न योग्य तुजला हें ९

दुष्टांचा संहारक, सज्जन–पालक, असें तुझें ब्रीद
लाविन कलंक त्यातें, करुनि सुखी धेनु, पसरवी मोद १०

सत्वरि रक्षण करि तूं धेनूंचें वेळ ना प्रभो ! लावी
दुर्लक्ष तूंच करिशी, दाद तरी मग कुणास मागावी ? ११

भारतिं धेनू नुरती, अनर्थ होईल तेधवां खास
निजधर्म ठार मेला, गमेल तेव्हां समूळ आम्हांस १२

गोमातेचें व्हावें रक्षण वाटें सदा प्रभो ! ह्मणुनी
या दत्तकिंकराची नम्र विनवणी मनीं झणीं आणीं १३

---

## पूर्वज–पद–वंदनावलि.

( वसंततिलका० )

वंशा मदीय कुलदैवत थोर नित्य
ज्याच्या कृपें कडुनि वाढत वंश सत्य
जो पावतो कलियुगीं अवध्या जनांस
त्या ‘ दत्तराज ’ गुरुच्या नमितों पदास १

माध्यंदिनीय ऋषि ‘ मुद्गल ’ नाम ज्यास
ज्या वेद मान्य दुसरा ‘ यजु ’ नाम त्यास

भावें करोनि नमना, मग गोत्रिजास
मीं वंदितों असति थोर तया पदास २

त्या गोत्रिं जन्मुनि गृहीं करि नित्य वास
सत्वस्थ जो चतुर, भूषण मत्कुळास
ज्यातें ‘ जनार्दन ’ सुनायक देति नाम
त्या पूर्वजास विनयें करितों प्रणाम ३

सोनें नि चांदि करि जिन्नस विक्रयास
या सार्ठी देति जन नाम ‘ सराफ ’ ज्यास
“ शेषाद्रि ” नायक असा नर भाग्यवंत
भावें करूं नमन त्या कुळिं जो पसंत ४

धंदा करोनि हरिला स्मरतो सदाही
‘ बाळाजि ’ नायक असें जगिं नाम देहीं
जो लोककार्य करितो वरुनी दयेला
भावें करूं नमन थोर पितामहाला ५

बाळोदरीं पुढति दोन सुपुत्र होती
त्यामाजि थोर ‘ हरि ’ ज्या प्रति नाम देती
राजाश्रया नि मिळवी धन, कीर्ति थोर
त्या भाग्यशील पुरुषा नमिं दीन पोर ६

बंधू कनिष्ठ हरिचा ह्मणवी ‘ अनंत ’
जो मूर्तिमंत जगिं भासत शांत संत
संसार ही करि परी नच लिप्त त्यांत
जो सर्वदा वदतसे मुखिं ‘ दत्तदत्त ’ ७

जो जन्म देइ पुढतीं मज बाळकाला
पोसोनि बाळपणिं दाखविलें जगाला
जो पुण्यशील नर, ना कधिं गर्व ज्याला
अत्यादरें नमन त्या करितों पित्याला ८

माता मदीय ‘ मनुबाइ ’ असे सुशील
जी सद्गुणी, पतिव्रता, बहु पुण्यशील
केलेंच थोर मज पाळुनि ज्या सतीनें
त्या माउलीस नमितों अति नम्रतेनें ९

सौभाग्य घेवुनि सवें जगिं मुक्त झाली
वंशास भूषणचि होउनि सत्य गेली
सच्छील, ज्येष्ठ भगिनी जणुं होति माता
त्या ‘ इंदिरा ’ भगिनिच्या पदिं ठेवि माथा १०

जे राहिले चुकुनि पूर्वज थोर मोठे
पितृव्य वा चुलति, मावशि, आत कोठें
सर्वांस त्या करुनि वंदन मागणें हो
आशिर्वचास मज द्या “ सुखि पोर राहो ” ११

होतील जे पुढति पुत्र मदीय वंशीं
सेवा घडो नित तुझी हरि रे ! तयासी
माझी अशी प्रभुवरा ! करि पूर्ण आस
हा ‘ दत्तकिंकर ’ तुझ्या नमितों पदास १२

---

# श्रीशंकरास धोक्याची सूचना !

पद [ चाल—भला जन्म हा० ]

मदनांतक ! शिव ! दयाघना ! हा भक्त करुनि प्रार्थना
देतसे, धोक्याची सूचना
जननीवांचुनि नंदीतें तूं सन्निध परि पाळिसी
योग्य हें वाटत कां मानसीं ?
पुत्र सुखानें राहुनि माता दुःखित होइल जरी
न्याय हा योग्य नसे भूवरीं
चाल— मी वदे कशास्तव लक्ष देइं यावरी
अति अघोर कर्मे होति भारतांतरीं
वध होइ धेनुचा क्रूरपणें कितितरी
खाया कोणी देइ न तिजशीं असह्यशा यातना
पाहतां दुःख वाटतें मना १
मांस-भक्षका दया न येते जरि कथिलेसें अति
सदोदित धेनूंतें कांपिती
असंख्य धेनू वधिल्या, वधिती, वधितिल कांहीं दिनीं
परि पुढें नुरती हें पाहुनी
होइल हल्ला नंदीवरती धेनुपुत्र देखुनी
टपति हे दुष्ट मांस-भक्षणीं
चाल— वधितील शंकरा ! खचित तुझ्या नंदिसी
मातले गुंड हे, सावध हो झटदिशी
तूं दुष्टच्छेदन करुनि रक्षि धेनुसी
' दत्तकिंकरें, काव्य-शृंखला ओढुनि ही सूचना—
दिली, करि मान्य भाललोचना ! २

---



[library stamp]

# अशांची संगति नको !

शा. वि.

होती नास्तिक, नष्ट, निर्दय बहू, सत्कार्य ज्या नावडे
धर्म-भ्रष्ट, परोपकार कधिंही ज्यांच्या करें ना घडे
तेंवी दुष्ट, न तुष्ट मानसिं, सदा रोगिष्ट देहाप्रती
देवा देइं न " दत्तकिंकर " वदे त्यांची मला संगति १
खोटे बोलति नित्य, सत्य नच ज्या स्वप्नींहि ठावें कदा
पापी, भ्रष्टविती जगीं कुलवती, उन्मत्त जे सर्वदा
गांजा, भांग नि मद्य, मांसहि विडी, सिग्रेट जे सेविती
देवा देइं न " दत्तकिंकर " वदे त्यांची मला संगति २
गप्पा झोडिति नित्य, सज्जनजना, देवासही निंदिती
सोडोनी निजधर्म-भक्ति, परक्या धर्मास जे वंदिती
लोकां गांजिति दुःख देउनि सदा द्रव्यास जे ओढिती
देवा देइं न " दत्तकिंकर " वदे त्यांची मला संगति ३

---

# श्री गौतमी-स्तोत्र.

वसंत तिलका.

आई ! जगज्जननि ! तूं जगिं थोर होसी
वानूं मुखें किति तुझ्या तरी मीं गुणांसी
थोरास तेंवि शिशुतें नित पाळितेस
श्री गौतमी ! नमन हें तव पादुकांस १
वास्तव्य देव करिती तव देहिं माते !
प्रेमें सदा करिति वंदन एकचित्तें

आहे तुझा विदित लौकिक या जगास
श्री गौतमी! नमन हें तव पादुकांस २

ज्याच्या गृहीं वससि तूं अति सौख्य-योगें
तेथें सदोदित खरें बहु सौख्य जागें
तूं कामधेनु असशी निज पूजकांस
श्री गौतमी! नमन हें तव पादुकांस ३

दुग्धा तुझ्या जगिं सुधेसम मानितात
त्याच्या बळें शिशु, बहू जन पोशितात
लोकांमुळेंच किति कष्टहि सोशितेस
श्री गौतमी! नमन हें तव पादुकांस ४

टाकून दुग्ध तव 'मद्यचि' कोणि घेती
तेंवी 'चहा' पिउनियां तनु जाळताती
होई परी खचित शेवटिं दुःख त्यांस
श्रीगौतमी! नमन हें तव पादुकांस ५

आहेत चंद्र, रवि नेत्रिं तुझ्या दयाळे!
कां झांकिशी नयन ते मग तूं कृपाळे!
सामर्थ्य तूं प्रगटवीं, दिपवीं जगास
श्रीगौतमी! नमन हें तव पादुकांस ६

होतीस तूंच मुनिंच्या[1] जंव आश्रमांत
सत्तेमुळें पळवुनी तुज भूप[2] नेत
त्वां दाविली निज चमत्कृति गे! नृपास
श्रीगौतमी! नमन हें तव पादुकांस ७

---

१ वसिष्ठमुनी २ विश्वामित्रराजा.

उन्मत्त, दुष्ट बहु भूवरि लोक होती
निंदा तुझी करुनि नित्यचि ताप देती
दिव्य स्वरूप धरुनी करि दंड त्यास
हा दत्तकिंकर करी विनती पदास ८

---

## हिंदु कोण?

पद ( चाल–दत्तराज योगी० )

हिंदु तोच ह्मणवी। भारतीं। हिंदु तोच ह्मणवी ॥ धृ० ॥
गोरक्षण, गोपालन निशिदिनिं करि जो आनंदानें
निज कर्तव्यचि समजुनि मोदें, वंदी गो प्रेमानें ॥ हिं० ॥ १
स्वधर्म प्रियकर मानुनि, करि जो पूजन गोपालाचें
तेंवी संकटकाळीं भावें पोषण करि धेनूचें ॥ हिं० ॥ २
गाई, गीता, गोविंदाच्या ठायीं प्रेमा ठेवी
तनु, मन, धन जो वाही त्यांना, हिंदु खचित तो ह्मणवी ॥ हिं० ॥ ३
हिंदुधर्मियां पूज्य देवता "धेनु" खरोखर आहे
'दत्तकिंकरा' असें मान्य, ज्या नसे, हिंदु तो नोहे ॥ हिं० ॥ ४

---

## श्रीदत्तात्रेयाष्टक.

( वसंततिलका )

श्रीदत्त! अत्रितनया! जगजीवना रे
त्रैमूर्ति! योगि! गहना! मनमोहना रे!
तूं भक्त–पालक खरा जगिं दंडधारी
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी? १

मूर्तीस मी जंव तुझ्या गुरु नित्य पाही
धेनूस बाळगिशि सन्निध गा ! सदाही
तूं सांग कां ? विसरसी मग दैन्यहारी
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी
होतात हाल बहु दुःखद, भारतांत
दे ना जरी पय, कुणी तिज ताडितात
शस्त्रें करीं धरुनि कांपिति दुष्ट भारी
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी
होतो जरीं वध जगीं बहु धेनुचा रे !
दत्ता तुला अजुनि कां करुणा नये रे !
तूं मौन टाकुनि विभो ! झणिं विघ्न वारीं
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी ? ४
शस्त्रें गदादि असुनी तव नित्य हातीं
शिक्षा खलास करण्यास न कामिं येतीं
तीं कासया जवळि ठेविसि दुर्विकारीं
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी ? ५
गाईस जे वधिति दुष्ट तयांस मारी
गोरक्षणीं झटति नित्य तयांस तारी
गोभक्षणीं टपति नीच तया निवारी
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी ? ६
झाली पुरे करि विभो ! अति मुग्धता ही
देशील लक्ष उरती, तरि धेनु कांहीं

नाहीं तरी कठिण ही जगिं वेळ भारी
धेनूस या तुजविणें प्रभु कोण तारी ? ७

वाली कुणी न तिजला तुजवीण देवा !
गोरक्षणीं वरद हस्त तुझा असावा
तत्सेवनीं तनु झिजो मम ही सदाची
हा दत्तकिंकर तुझ्या पदिं हेंच याची ८

---

## पुढें कसें होणार ?

**पद ( चाल–राधाधर मधु० )**

होतो गो–संहार ! कृष्णा ! भारतिं वारंवार ! धृ०
विप्रें सोडुनि स्वधर्म, वरिला गो–विक्रय–व्यवहार ! कृष्णा !
क्षत्रिय झाले गार ! कृष्णा ! शौर्यहि झालें ठार ! कृ० !
वैश्य पाळिती नच धेनूतें, कोण तिला पुसणार ? कृ० !
शूद्र सदा लाचार ! कृष्णा ! दीन काय करणार ? कृ० !
ऐशा योगें गोरक्षण तें, काय कसें होणार ? कृ० !
दुष्ट मातले फार ! कृष्णा ! दंड कोण करणार ! कृ० !
कंठ धेनुचा चरचर चिरिती, निर्दय खाटिक फार ! कृ० !
कोण तिला आधार ? कृष्णा ! तुजविण जगिं होणार ? कृ० !
नत–जन–रक्षक, गोपालक हें, ब्रीद तुझें असणार ! कृ० !
उलट जरी होणार ! कृष्णा ! उलट जरी करणार !
'दत्तकिंकरा' कळे न, तरि मग " **पुढें कसें होणार ?**" कृ० ! १

---

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत सं. ... नं. ... ता. ...

# काव्य–देवतेस

पद ( चाल–लावणीची )

तूं काव्य देवि सुंदरी ! । वसन भर्जरी–।
नेसुनी शब्द–समुहाचें, नांदसी जगाभीतरीं ॥ धृ० ॥
देखुनी तुझ्या सद्गुणा । तोष मन्मना–।
होतसे किती तो सांगू, तुजविणें कोणत्या जनां । १
सौंदर्य तुझें पाहुनी । रसिक निजमनीं ।
भाळले, भाळती आतां, भुलतील पुढें निशिदिनीं । २
सहवास तुझा हो जरी । क्षणभरीं तरी ।
तुज सोडुनि जावें वाटे, नच रसिकजनां अंतरीं । ३
लाभता तुझी संगती । पालटे मती ।
ना विषय दुजा मग वाटे, लव मधुर कदा त्याप्रती । ४
वृक्षादि वसति पर्वतीं । नद्या चालती ।
चहुंकडे जनींवनिं तैसें, तव रूप रसिक देखती । ५
सुस्वरूप तुज पाहुनी । सत्कवी मनीं ।
लागलें वेड वहु त्यांना, वर्णिती गुणांतें कुणी । ६
बनलाच पिसा वाल्मीक । तेंवि तो शुक ।
तदुपरी ज्ञानदेवादि, कवि तुका, मयूरादिक । ७
तो कलिदास पंडित । कवी महीपत ।
श्रीधरहि रामदासादि, झालेच त्वपदीं नत । ८
संप्रती सत्कवी किती । तुला भाळती ।
गडकरी, टिळक, टेकाडे, तव गुणा सदा वानिती । ९

कवि महाजनहि सन्मती। मार्ग चालती।
नच शक्ति परी मी चाले, बहु मुदें देवि! या पथीं। १०
देवते! छंद लागला। तुझा गे! मला।
म्हणुनिया काम सोडोनी, तव धाम वरी मी भला। ११
तुजविणें इतर कार्य तें। तुच्छ वाटतें।
कधिं अन्नपाणि ना भेटें, ना स्मरण मनीं येइ तें। १२
सहवास दत्तकिंकरा। गमतसे बरा।
म्हणुनियां विनति चरणास, तव भजनिं वसो मम गिरा। १३

---

## अभय-दान !

पद—( चाल-हटातटानें० )

जनकजननिसी त्यागुनि दत्ता! वनवासा भोगिसी
सदा तूं स्वच्छंदें वागसी धृ०

तव दैवानें दैन्य मांडिलें जोगि बनविलें तुला
भटकशीं सदा जगीं एकला
धेनु, श्वानादिक पशुसंगें काळ नित्य कंठिसी
त्रास हा व्यर्थ किती सोसिशी ?
चाल-तूं झोळी घेउनि भीक सदा मागसी
नच भीक कुणी ही घाली तोषें तुसी
शेवटीं कसें तरि कोल्हापुरिं जेविसी
निद्रा घ्याया सदन कुठें नच अंथरूण ना उशी
डोंगरीं माहुर गडिं झोंपशीं १

लंगोटीनें झांकिशि तनु तूं तैल नसें कुंतला
जटेचा भार शिरीं वाढला
कस्तूरीची उटी तुला नच ठाऊक आहे कशी ?
तनूतें राख सदा फांसिशीं
चाल—तुज उष्णोदक ना स्नाना देई कुणी
बुडसि तूं प्रयागीं शीत डोह देखुनी
कधिं शीत निवारायास्तव लाविसि धुनी
अश्व न रथ तुज मिळे प्रवासा पायिं सदा चालसी
त्रिभुवनीं फेरे किति घालिसी २
निराधार तुज देखुनि मजला कींव येतसे मनीं
हिताची गोष्ट ऐक तूं झणीं
देहरूपिं मम नगर वसाया देत गड्या ! मी तुला
खरोखर जीव तुझा भागला
चाल—तूं हृदय—मंदिरीं सिंहासन मांडुनी
बैस बा ! सुखानें शांत चित्त ठेवुनी
नच योग्य दिसें मज फिरणें निशिदिनिं वनीं
कष्ट न होतां खरा विसावा इथें पूर्ण भोगिसी
व्यर्थ कां ? भुवन—त्रय धुंडिसी ? ३
प्रेम—स्नेहा लावुनि तनुला स्नान तुला घालितों
भक्तिचें उष्णोदक ओतितों
काम—क्रोधां खाउनि माझ्या भोजन करि आदरें
पाहुं तूं नको कुणाचीं घरें

चाल—तुज गमे तरी घे झोंप हृदय–मंदिरीं
तुज गमे तरी तूं नाच हृदय–मंदिरीं
तुज गमे तरी तूं क्रीडा करि अंतरीं
विश्रांतीचा लाभ मिळावा वाटे जरि मानसीं
तरी तूं मोडि न या गोष्टिसी ४
त्रिगुणाचा नव सुवर्ण मंचक निद्रेस्तव मांडितों
शांतिचें अंथरूण घालितों
सेवेसाठीं, आशा, माया, दासी मी अर्पितों
मनासी द्वारिं उभें ठेवितों
चाल—हें सौख्य बघुनि मम मान्य करी विनवणी
ही " लक्ष " दक्षिणा समज आपुल्या मनीं
श्रीदत्तात्रेया ! दूर न दे लोटुनी
दत्तकिंकरा कींव वाटली दत्तप्रभुची अशी
ह्मणुनि त्या अभय दिलें मानसीं ५

---

## मंगल–स्वप्न.

### अथवा

### मनीं वसे तें स्वप्नीं दिसे !

[ एक दांपत्य थाटानें मंगळागौरीची पूजा करीत बसलेले पाहून एका विवाहेच्छु अविवाहितास पडलेलें स्वप्न तो आपल्या मित्रास सांगतो. ]

पद ( चाल–फटक्याची० )

श्रावण मासीं मंगळवारीं, मंगल उत्सव मज गमला
युवतीसह मी बसलों भावें मंगळगौरी–पूजेला १

प्रथम प्रियेसह सुगंध तैलें लावुनि हौसेनें तनुसी
वाजंत्री सुस्वर लावोनी, पुढतीं केलें स्नानासी
नंतर मम सखि नेसत अंबर पीत, रेशमी, नविन, जरी
अंगिं कंचुकी घालि बुट्यांची, दागदागिने तनूवरी ३

सुवर्ण–मौक्तिक माळ गळ्यासी, मूद, राखडी घालि शिरीं
शिंदेशाई तोडे पायीं, गोठ, पाटल्या तशा करीं ४

स्वयेंहि हस्ता सुवर्ण कंकण, कंठा कंठीं घालोनी
उंचीं वस्त्रें, शाल भरजरी, ओढुनि बसलों मी पुजनीं ५

सोनेरी तें मखर बांधुनी पडदे दिधले मखमलिचे
शुभ्र बिलवरी दर्पण लावुनि, हंड्या झुंबर कांचेचे ६

हरित वर्ण नव पर्ण सुशोभित कोमल लावुनि आम्राचें
खांब केळिचे रोवुनि त्यावरि हार सोडिले पुष्पांचे ७

लावोनी नव बँड, चौघडा, ताशा ढोलहि ढमढमिती
सनया, सुस्वर शिंग, तुतारी, वाजंत्रीही वाजविती ८

हेम–प्रतिभा गौरिदेविची, जी दे सौभाग्यास बरी
मम कांता मग चौरंगीं तिज मांडुनियां पूजेस करी ९

हळदी, कुंकू, लाल अक्षता, सुगंध पुष्पें सेवंती
बकुल, मोगरा, जाईजुई नी गुलाब पारीजातक तीं १०

नानापरिचीं फुलें गौरिला वाहुनि आम्हीं अतिमोदें
धूप सुगंधी बत्त्या जाळुनि दीप लाविले आनंदें ११

पुढें रुप्याच्या ताटामाजीं, शिरा बदामी, लाडु, पुऱ्या
बासुंदी, श्रीखंड, मोतिचुर, घीवर, जिलबी, साटोऱ्या १२

ठेवुनि यापरि पक्वान्नें, नैवेद्य दाविला देवीला
विडा करोनी त्रयोदशगुणी, सद्भावानें तो दिधला १३

हळदीकुंकासाठीं युवती जमल्या भोंवति कितिक तरी
सान थोर नव सुंदर तरुणी, वृद्धहि आल्या परोपरी १४

नेसुनि पैठणि जरतारी, कुणि अलंकार नव तनूवरी
कुणी शालुही नेसुनियां, जरिकांठी कंचुकि लेइ वरी १५

बुटेदार कुणि शाल ओढुनी, नीलरंगि कुणि वसन नवें
कुणि सोनेरी, रंग गुलाबी, नेसुनि आल्या मुलीसवें १६

पूजा होतां ओंवाळिति मग पंचारति घेवोनि करीं
उभ्या राहुनी भगिनी ह्मणती, कितिक आरत्या मधुर स्वरीं १७

जय जय जय जय देवी माते ! आरति करुं ही तुजप्रती
अनन्य भावें शरण पदातें, आलों आम्हीं तुजपुढती १८

मंगलकारक, विघ्ननिवारक, दैन्यविनाशक, जयदेवि !
भक्तां पालन करणारी तूं, सौख्य आमुतें नित दावी १९

आरति ऐशी चालत असतां, मोद–विघातक विघ्न पडे
मम तनुवरती, मूषक पडुनी नंतर खेळे चहूंकडे २०

त्यायोगें मी जागा होउनि आरति पाहे जंव नयनीं
आरति हातीं नच त्या भगिनी, दिसल्या होत्या ज्या स्वप्नीं २१

मनोराज्य तें गेलें विलया ध्यास मनाचा हें ठरलें
“मनीं वसे तें स्वप्नीं दिसतें” दत्तकिंकरासी कळलें २२

---

## वेडें जग !

शा. वि.

काव्याचें मज वेड लागुनि सदा वेडाच झालों जनीं
वेडे मत्सम कोण केविं असती हें पाहिलें शोधुनी
तेव्हां वेड कुणा सदा दिसतसें देशाचिया रक्षणीं
कोणातें प्रभुचेंच वेड, नि कुणा दारू, विड्या सेवनीं १

लागे वेड कुणास गायनिं सदा, गातोच रात्रंदिनीं
सारंगी, तबला, सतारहि कुणी पेटी बसे घेउनी
कोणी लेखन-वाचनांत बनतो वेडा सदा गुंगुनी
कोणा चैन न कामिनीविण कदा, वेडा बने मोहुनी २

द्रव्याचें कितिकांस वेड, नि कुणी वेडे स्वधर्मामुळें
स्वातंत्र्यास्तव वेड लागुनि कुणा, सत्ता करी बावळें
ऐशा या विविध प्रकारिं असतें हें वेड या भूतला
"वेडें हें जग" दत्तकिंकर वदे आलें कळोनी मला ३

---

## भाग्यशाली कोण ?

शा. वि.

बांधा नाजुक, ठेंगणी, तरुणशी,
सच्छिल जी देखणा।
वर्णें गौर, सुलोचना, मधुवचें
संतोष देते मनीं

ऐसी सद्गुणि कामिनी, पतिव्रता,
ज्या लाभलीसे नरा
संसारीं बहु 'दत्तकिंकर' वदे
तो 'भाग्यशाली' खरा १

---

## अंगाई गीत.

( चाल—पाळण्याची )

निज निज निज बाळे ! । वेल्हाळे ! । मोहिसि मायाजाळें । निज० ।ध्रु०॥
बहुतचि खेळूनी । निशीदिनीं । शिणलिस बाई म्हणुनी ।
बाळे ! तुजलागीं । कां अजुनी । झोंप न लागे नयनीं ।
किंवा दृष्ट तुला—। कोणाची झाली न कळे साची ।
वाटें दुःख तुझ्या—। काय मनीं । निज वैभव गे ! स्मरुनी ।
वद वद वद आतां । मम बाळे ! दुखती का तव डोळे ।
माझी छबूकडी । तान्हूली । बोल चिमुकली बोली ।
टकमक टकमक तूं । कां बघशी ? । गालीं हळूंच हंससीं ।
हंसरे कोमलसे । तव गाल । हंसुनी झाले लाल ।
घडिभरि याचपरी । तूं रडसी ! सर्वेचि बाळे ! हंससी ।
करिशी मौज अशी । पुरे करी । झोंप घेइ तूं सत्वरि । निज० ॥

---

## फोल तुझा अभिमान !

पद ( चाल—म्हातारा इतुका न अव० )

रूपाचा अभिमान । धरीं नच रूपाचा अभिमान ध्रु०
प्रिये ! तुजहुनी सुंदर असती, अनेक ललना जाण । धरी०
सुंदर, पाणीदार नेत्रही, सरळ नासिका मान । धरी०

दत्तकिंकरकृत

# सन्मार्ग-दर्शक-पुस्तक-मालेचीं

## उपयुक्त पुस्तकें.

या मालेंतून विविध विषयांवरील स्वतंत्र पुस्तकें प्रसिद्ध होत असतात. निजाम स्टेटमधील, स्वतंत्र विषयांवरील पुस्तकें प्रसिद्ध करणारी हीच पहिली माला होय. फक्त चार आणे प्रवेश फी भरून नांवें नोंदविणारांस आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या व पुढें प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकास पाऊणपट किंमत पडेल! आतांपर्यंत छापून प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें पुढें दिलीं आहेत.

### (१) श्रीतुकाराममहाराज येहेळेगांवकर यांचें सचित्र चरित्र

आपल्या योगसामर्थ्याच्या बळावर कित्येक अद्भुत चमत्कारांनीं जगास थक्क करून सोडणाऱ्या व ब्रह्मज्ञानोपदेशानें खऱ्या शाश्वत सुखाचा लाभ करून देणाऱ्या, अत्यंत ज्ञानी व सामर्थ्यवान् अशा सत्पुरुषाचें चरित्र प्रत्येकानें अवश्य वाचण्यास योग्य आहे. किंमत अवघी ४ आणे.

### ( २ ) श्री शारदा स्तोत्र !

हिंदुधर्मीय मुलांनीं विद्याप्राप्तीसाठीं नित्य पाठांत ठेवण्यास हें स्तोत्र फारच सुलभ करुणरसानें ओथंबलेलें, फारच योग्य आहे. सार्वजनिक उत्सवप्रसंगीं मुलांना बक्षिस देण्यास उत्तम. किंमत अवघी दोन आणे.

### ( ३ ) धूम्रपान निषेध-पद्यावलि !

तंबाखू अर्थात् विड्या, सिगारेट इत्यादि ओढण्यापासून शारीरिक, आर्थिक, व धार्मिक दृष्टीनें केवढी भयंकर नुकसानी आहे याविषयीं यांत माहिती सांगून, या व्यसनापासून परावृत्त होण्यासाठीं जनतेंतील प्रत्येक वर्गास विनति केली आहे. सार्वजनिक गणेशोत्सवांत यांतील पदें मुलांना शिकविण्यास फारच परिणामकारक आहेत. किंमत तीन आणे.

### ( ४ ) मुंबईची मौज !

आजपावेतों मुंबई ज्यांनीं पाहिलीच नसेल त्यांस घरीं बसूनच मुंबईंत काय काय प्रेक्षणीय मौज आहे हें या पुस्तकावरून समजून

येऊन क्षणभर मनाची करमणूकहि होईल! यांतील वर्णन कटावद्वारें असल्यामुळें वाचतांना देखील फारच मौज वाटते! किंमत अवघी दोन आणे.

## (५) श्री गोदाष्टक.

नित्यशः स्नानाचे वेळीं म्हणावयास प्रार्थनापर योग्य अष्टक. किंमत एक आणा.

## (६) श्रीसद्गुरु-भजनामृत.

श्री. महाजनांच्या प्रेमळ पद्यासह. यांत श्रीगुरु मारुतिमहाराज तेरकर रामदासी यांच्या स्तवनपर पदें, अष्टकें, आरत्या, धांवे इत्यादि फारच उत्तम असून महाराजांचा फोटोहि यांत दिला आहे. महाराजांच्या शिष्यमंडळींनींच काय पण सर्वच गुरुपुत्रांनीं यांतील पदें नित्यशः पाठांत ठेवण्यायोग्य आहेत. किंमत अवघी चार आणे.

## (७) श्री म्हाळसा-कृपामृत.

श्रीम्हाळसादेवीवरील स्तवनपर अष्टकें, पदें, स्तोत्र इ. करुणापर फारच योग्य पुस्तक प्रत्येक देवीभक्तांनीं संग्रहीं ठेवावें. किंमत अवघी दोन आणे.

## (८) वैश्य त्रिकाल संध्या.

वैश्य मंडळींना नित्यशः उपयोगी. किंमत अवघी तीन आणे.

## (९) विडीचें कृष्णकृत्य.

या दोन श्लोकांचा मोठ्या अक्षरांचा बोर्ड बैठकींत लावून ठेवल्यास त्यांच्या अवलोकनानें विड्या, सिगारेटचें व्यसन खात्रीनें सुटेल. किंमत अवघी एक आणा.

प्रत्येक पुस्तकास टपाल व्ही. पी. खर्च वेगळा पडेल. एकाच पुस्तकाची एकच प्रत मागविणें असेल तर पोस्टाचीं तिकिटें पाठविणें. व्ही. पी. नें खर्च जास्त येईल.

वरील पुस्तकांशिवाय कोणतींहि शालोपयोगी पुस्तकें, श्रीदत्त प्रेसचीं पुस्तकें, संत दासगणू महाराजांचीं पुस्तकेंहि आमचेकडे मिळतील. कोणत्याहि पुस्तकांच्या प्रती घेणारांनीं पत्रद्वारें खुलासा करून घेणें म्हणजे स्वस्त भावांत पुस्तकें देऊं. पत्ताः—**गणेश अनंत सराफ.**

श्रीदत्त प्रेस, मोंढा बाजार, मु. नांदेड. पो. नांदेड (निजाम स्टेट.)

तेजस्वी किति वदनचंद्रमा वर्णहि गोरापान । धरी०
दंत–पंक्ति नव दाळिंबाच्या बीजाची जणु खाण । धरी०
नाजुक बांधा, कोमल कटिही तुजहुनि कितितरि तान । धरी०
एकाहुनि नव एक जगतिं या रमणि असति गे ! छान । धरी०
सृष्टीमाजीं अनेक रत्नें काय असे गे ! वाण ? । धरी०
तुला वाटतें मजहुनि सुंदर कोणिच नाहीं जाण । धरीं०
परि ललने ! गे ! सत्य सांगतों "फोल तुझा अभिमान" । धरी० १

---

## जगदवलोकन.

( साकीवृत्त )

गृहीं बसोनी होतों तों वरि " गृह–जग " वाटे मजला
परि बाहेरी गृहें देखतां विचार मनिं मग धजला १
'गृह' हें नाहीं जग आणिक तें असेल हें समजोनी
स्वग्रामीं मीं निघे फिराया, पाही गांव फिरोनी २
गांव आपुलें मोठें दिसतें तेंच मनीं 'जग' गमलें
गांव रूपि हें जग देखोनी तेथें मन्मन रमलें ३
प्रसंग येतां निघे फिराया दुसऱ्या एका गांवीं
गांवामागुनि गांव पहातां आस वाढली भावी ४
दहा वीस हीं गांवें मिळुनी, जग बनलें मग कळलें
परी फोल तो विचार ठरला, पुढतीं मन जधिं वळलें ५
काशीयात्रेनिमित्त निघतां देखे प्रयाग, काशी
अफाट जग मग गमलें पाहुनि नव्या नव्या गांवासी ६

पहाड, पर्वत, ओहळ, सरिता, दिसती अफाट नयनीं
रामेश्वरचा सागर देखुनि कौतुक गमलें स्वमनीं ७

अफाट किति हा भव्य पसारा, संचरलासे जगतीं
तेंवी दिसते अपूर्व शोभा नभोमंडळावरती ८

नेत्रीं दिसते त्याच वस्तुतें जग मी मानूं लागे
परि मज सुचलें त्याचा पुढतीं विचार केला वेगें ९

ऐकत आहे रूस, जर्मनी, अमेरिकादिक खंड
इंग्लंडादिक प्रचंड देशहि जगामधींच उदंड १०

सागर, पर्वत, मोठे कितितरि असती पृथ्वीपोटीं
'गृह' हें जग ही क्षुद्र कल्पना झाली माझी खोटी ११

या पृथ्वीसम अनेक असती या ब्रह्मांडीं गोल
शास्त्र-श्रवणीं पडतां कळली गोष्ट होति जी खोल १२

साऱ्या जगता धनी एक तो ईश्वर, मग मज कळलें
अद्भुत पाहुनि शक्ति तयाची तत्पदिं मन हें वळलें १३

अनंत ब्रह्मांडाचा नायक जो परमेश्वर त्यास
दत्तकिंकरें वंदन केलें टाकुनि अभिमानास १४

# श्री शिव-प्रशस्ति !

पद ( चाल—जरि कुणा श्रीमंताची )

**हिंदु-धर्म-शत्रू** झाले प्रबल भारतीं या ।
दीन जनां छळिती भारी नसे तया माया ॥ १ ॥

धेनु दीन दुर्बल पशुतें वधिति चराचरा ते ।
भ्रष्ट करिति अन्यायानें कितिकशा द्विजांतें ॥ २ ॥

**द्रौ**पदी नि **सी**तेसम ज्या पतिव्रता सतीसी ।
अब्रु त्यांचि घेउनि निर्दय नेति निज गृहासी ॥ ३ ॥

कितिक करिति दिवसा ढवळ्या रक्तपात ऐसा ।
दीन हिंदु देखुनि त्यांचा हरण करिति पैसा ॥ ४ ॥

मोड तोड करुनी करिती नाश मंदिराचा ।
**मूर्तिभंग**-होई **नि**शिदिनिं अंत नसे त्याचा ॥ ५ ॥

न्याय-नीति फेंकुनि देती राखुनी स्वपक्षा ।
सांपडेल तेथें देती हिंदुंना स्वदीक्षा ॥ ६ ॥

असंख्यात ऐशा लोकां धर्मभ्रष्ट केले ।
बळें कितिक, लोभें कोणा, आपुल्यांत नेलें ॥ ७ ॥

* * *

घालुनियां गोंधळ ऐसा, दुष्ट होति पाजी ।
कठिण काळ, अवतरलासी बघुनि तूं शिवाजी ! ॥ ८ ॥

धैर्य-बळें मार्गीतिल त्वां सारुनी सराटे ।
देशकार्य केलें जमवुनि मावळे मराठे ॥ ९ ॥

कर्महीन बनला जेव्हां अखिल महाराष्ट्र ।
    कर्मवीर करुनी त्याला स्थापिलें स्वराष्ट्र ॥ १० ॥
दुष्ट लोक जे जे होते मत्त बहुत त्यांना ।
    दाविलें महाराष्ट्राचें पाणि त्वां अरींना ॥ ११ ॥
**हिंदु–धर्म** रक्षण केला, जगीं अवतरोनी ।
    फडकविला भगवा झेंडा मावळ्या विरांनीं ॥ १२ ॥
सर्व लोक झाले सुखि बा ! शिवा ! त्वत्कृपेनें ।
    कांहिं काळ गेला ऐसा खचित शांततेनें ॥ १३ ॥

* * *

परी तेंवि पुनरावृत्तिच आलि महाराष्ट्रीं ।
    फंदगुंड माजुनि करिती नाश हिंदराष्ट्रीं ॥ १४ ॥
कलह नित्य चालू झाले अति परस्परांत ।
    वालि कोणि उरला नाहीं हिंदुंना जगांत ॥ १५ ॥
धांव ! धांव ! धांवुनि वेगें छत्रपते ! राया ! ।
    पुन्हां महाराष्ट्रीं येईं अरी निर्दळाया ॥ १६ ॥
रक्षि रक्षि हिंदू–धर्मा रक्षि विप्र, गाई ।
    अशा वेळिं तुजविण आम्हां साह्य कोण होई ? ॥ १७ ॥
संकटास वारुनि सुखवी हिंदु बांधवांस ।
    अभयदान देईं भूपा ! **दत्तकिंकरास** ॥ १८ ॥

# देवी अहल्या.

पद ( चाल—भला जन्म हा० )

भारतरत्नामाजी, विलसे मेरुपरी माउली—
अहल्या दिनाची साउली धृ०
स्वातंत्र्याची पूर्ण देवता, जणू गमे पार्वती
मावळे वीर दूत भोंवतीं
धैर्यशील, अति शूर विक्रमें रणांगणीं चमकली
जणूं कां वीज नभीं भासली
चाल—निज पराक्रमें जी शौर्य गाजवी अति
निज पराक्रमें जी प्रसिद्ध झाली सती
निज पराक्रमें जी पळवी अरि भारतीं
हिंदु जनांची, नतगरिबांची होय कुलस्वामिनी
खळांच्या तत्पर निर्दाळणीं १

निज देशाचा, निज राज्याचा स्वाभिमान ठेवुनी
धांवली राष्ट्राच्या रक्षणीं
दानशूर, रणशूर, सनातन—धर्म रक्षणीं सदा
वेंचिली अमित जिनें संपदा
चाल—बांधिले नवनवे घांट कुठें नदि—तिरीं
बांधिलीं मंदिरें भारतभूमीवरी
कित्येक मंदिरीं जीर्णोद्धारहि करी
होळकरांच्या वंशा भूषण झालि खरोखर अति
जियेला थोर थोर वंदिती २

जननी नच ती मालोजीची, राष्ट्राची, आमुची
माउली पूज्य सकल हिंदुची
कर्म–योगिनी, धर्म–पालनीं दक्ष सदा राहिली
तपस्विनि मोक्ष–पदा पावली
चाल–-–निष्कलंक राहिलि कीर्ति जिची भारतीं
तिजसमान झाली भूवरि कोणि न सती
तद्गुणा वर्णितां कुंठित होते मति
दत्तकिंकरा देवि अहल्या योग्य माय वाटली
तत्पदीं मिठी ह्मणुनि घातली ३

---

## * श्री पांडुरंग दर्शन.

पद ( चाल–भला जन्म हा तुला लाधला )

झाली इच्छा पूर्ण मनाची थोर लाभ लाभला ।
प्रभु मीं पंढरपुरिं देखिला ।
उभा विटेवरि अठ्ठाविस युग भीमरथींच्या तटीं ।
ईश जो कर ठेउनियां कटीं ।
जरी पितांबर, अंगीं चंदन, पगडी शिरिं कोंकणी ।
तुळशिची माळ गळां घालुनी ।
फुलें सुवासिक, तुरे खोंविले, बुका भालिं साजिरा ।
शोभतो रखुमाईच्या वरा

---

* शके १८३८ वैशाख वद्य चतुर्थांस प्रथम पंढरपुरास गेल्यावेळीं दिसलेला सोहळा यांत वर्णिला आहे.

चाल—ज्या पुढें बैसती संतभक्त बहु सदा ।
जो दूर करी हरि भक्तांच्या आपदा ।
तो उभा राहिला दावाया निजपदा ।
भक्तासाठीं जो जगजेठी सगुणरूप जाहला ।
प्रभु मीं पंढरपुरिं देखिला ॥ १ ॥

ज्या पूजेचा बहुत सुखाचा मौजेचा सोहळा ।
होतसे थाट सदा राउळा ।
नित्य नव नवे थोर सानही भक्त येति दर्शना ।
पुरवितो हरी मनः कामना ।
शेजारतिही देखुनि डोळां, मोद मनीं वाटला ।
चरणिं मीं देह तदा लोटिला ।
चाल—वैकुंठपुरीही मृत्यु लोकिंची खरी ।
या नगरासम जणुं क्षेत्र नसे भूवरी ।
मज सत्य गमलि ही सुखदायक पंढरी ।
दामाजीच्या भक्तीसाठीं धेड विठू जाहला ।
प्रभु तो पंढरपुरिं देखिला ॥ २ ॥

अष्ट नाइका, उभ्या राउळीं सेवेतें राहिल्या ।
त्या मीं दृष्टिभरें पाहिल्या ।
नामदेव, पुंडलीक ऐशा थोर भक्त–दर्शना–।
घेउनी तोष वाटला मना ।
गोपाळाच्या पुरीं जाउनी हरिलीला पाहिल्या ।
पादुका विष्णूच्या वंदिल्या ।

जननी नच ती मालोजीची, राष्ट्राची, आमुची
माउली पूज्य सकल हिंदुची
कर्म–योगिनी, धर्म–पालनीं दक्ष सदा राहिली
तपस्विनि मोक्ष–पदा पावली
चाल——निष्कलंक राहिलि कीर्ति जिची भारतीं
तिजसमान झाली भूवरि कोणि न सती
तद्गुणा वर्णितां कुंठित होते मति
दत्तकिंकरा देवि अहल्या योग्य माय वाटली
तत्पदीं मिठी ह्मणुनि घातली ३

---

## * श्री पांडुरंग दर्शन.

**पद** ( चाल–भला जन्म हा तुला लाधला )

झाली इच्छा पूर्ण मनाची थोर लाभ लाभला ।
प्रभु मीं पंढरपुरिं देखिला ।
उभा विटेवरि अठ्ठाविस युग भीमरथींच्या तटीं ।
ईश जो कर ठेउनियां कटीं ।
जरी पितांबर, अंगीं चंदन, पगडी शिरिं कोंकणी ।
तुळशिची माळ गळां घालुनी ।
फुलें सुवासिक, तुरे खोंविले, बुका भालिं साजिरा ।
शोभतो रखुमाईच्या वरा

---

* शके १८३८ वैशाख वद्य चतुर्थीस प्रथम पंढरपुरास गेल्यावेळीं दिसलेला सोहळा यांत वर्णिला आहे.

चाल—ज्या पुढें बैसती संतभक्त बहु सदा ।
जो दूर करी हरि भक्तांच्या आपदा ।
तो उभा राहिला दावाया निजपदा ।
भक्तासाठीं जो जगजेठी सगुणरूप जाहला ।
प्रभु मीं पंढरपुरिं देखिला ॥ १ ॥

ज्या पूजेचा बहुत सुखाचा मौजेचा सोहळा ।
होतसे थाट सदा राउळा ।
नित्य नव नवे थोर सानही भक्त येति दर्शना ।
पुरवितो हरी मनः कामना ।
शेजारतिही देखुनि डोळां, मोद मनीं वाटला ।
चरणिं मीं देह तदा लोटिला ।
चाल—वैकुंठपुरीही मृत्यु लोकिंची खरी ।
या नगरासम जणुं क्षेत्र नसे भूवरी ।
मज सत्य गमलि ही सुखदायक पंढरी ।
दामाजीच्या भक्तीसाठीं धेड विठू जाहला ।
प्रभु तो पंढरपुरिं देखिला ॥ २ ॥

अष्ट नाइका, उभ्या राउळीं सेवेतें राहिल्या ।
त्या मीं दृष्टिभरें पाहिल्या ।
नामदेव, पुंडलीक ऐशा थोर भक्त–दर्शना–।
घेउनी तोष वाटला मना ।
गोपाळाच्या पुरीं जाउनी हरिलीला पाहिल्या ।
पादुका विष्णूच्या वंदिल्या ।

चाल—धन्य ते खरोखर नांदति पंढरपुरीं ॥
देखती नित्य जे प्रभुपद भीमातिरीं ।
सोहळे प्रभूचे पाहति नानापरी ।
जमींसवें जो दळी सुखानें होउनि वश भक्तिला ।
प्रभु तो पंढरपुरिं देखिला ॥ ३ ॥
धूपारतिच्या वेळीं जेथें लोक येति दर्शना ॥
काय करुं थाटाच्या वर्णना ।
तुळशी माळा, बुका वाहती जन ते प्रभुच्या शिरीं ।
देखतां हर्ष होय अंतरीं ।
गोरा, चोखा, तुकाराम नी रोहिदास बोधला ।
दृष्टिनें सर्वांनीं पाहिला ।
चाल—घणाघणा, घड्याळें, राउळांत वाजती ।
ढमढमा नगारे नादानें गर्जती ।
" पंढरीनाथ " हे शब्द भक्त बोलती ।
अनंतनंदन दत्तकिंकरें प्रेमें तो वंदिला ।
प्रभु तो पंढरपुरिं देखिला ॥ ४ ॥

---

## महाजन–प्रशस्ति.

श्लोक ( शा. वि. )

विद्यादायिनि शारदा, सकलही शास्त्रें जिच्या स्वाधिन
आह्मांसाठिंच दूत काय दिधला वाटे तिनें धाडुन
ज्या दूतें निज सद्‌गुणें बहुजनां सन्मार्ग तो दाविला;
येता संशय मानसीं, निजवचें जेणें सदा वारिला १

वाणी गोड सदाहि नम्र वचनें लोकांत जो वागतो,
ज्याची बुद्धि विशाल, धीट समयीं, लोकाग्रणी शोभतो;
काव्याचा जणुं मूर्तिमंत पुतळा आला असे भासे
ईशें सद्गुण ज्या दिला, तरि कुणा येईल त्याची सरी २

साधा वेष, वृथाभिमान कधिं ना ठेवी जनीं वा मनीं
भासे ठेंगणि मूर्ति ही परि खरी अत्यंत आहे गुणी
ज्याचें अल्प असोनिया वय, गुणें थोरांसही लाजवी,
वेळोवेळिं करोनि कीर्तन जनां बोधामृता पाजवी ३

चाले लेखनवाचनादि कविता, उद्योग ज्याचा सदा
तंबाखू नि विडया, चहास न शिवे दु:संगतीनें कदा;
ज्याचें वर्तन नीतियुक्त असुनी, लोकोपकारा करी
कीं ते सद्गुण पाहुनी क्षणभरी शत्रूहि मोदा वरी ४

अन्यायें जधिं विप्रवर्ग मिळुनी टाकी बहिष्कार तो
धैर्यानें बहु शांत होउनि तदा ही मौज जो पाहतो;
झाली हानि परी न सोडि सहसा बाणी मुळीं आपली
झालें शुद्ध सुवर्ण तावुनि पुन्हां, विघ्नेंहि दूरावलीं ५

जो का हास्यमुखीं स्वयें, हंसवितो लोकांसही सर्वदा
प्रत्येकास जणूं स्वकीय गमतो, ना दंभ दावी कदा
प्रेमानें मनिं वाटतें सकळिकां सत्संग व्हावा असा
**देवीदास महाजनास** बघुनी झालोंच मी हा पिसा ६

वक्तृत्वीं कुशल स्वयें, प्रकटवी आख्यान–रत्नावली
काव्यें रम्य रचूनि यन्मति तशी रामायणीं गुंगली

ज्यानें देउनि धैर्यबुद्धि मजला लोकांपुढें आणिलें
शंका दूर करोनिया मज जयें काव्यांगणीं ओढिलें ७
माझा हा नच मित्र, जो गुरु खरा साक्षात् मला वाटला
काव्याचा ह्मणुनीच हार विनयें तत्कंठिं मीं अर्पिला
लाभो आयु तया उदंड सुखवी सेवावयातें जनां
प्रेमानें अशि 'दत्तकिंकर' करी देवा ! तुला प्रार्थना ८

---

## मार्ग–प्रतीक्षा !

पद ( चाल—डोळे हे जु॰ )

आलि आलि 'आगगाडि' येतिल कां ? आज गडे !
वाट बघत दारिं उभी, नित्य नेत्र गाडिकडे
'आज उद्यां' 'आज उद्यां' दिवस असे जाति किती ?
रात्रंदिन चैन नसे, काय करूं कैसि गति
गुंतलेत कवण कार्यिं, कळत बये ! मुळिं न मशीं
काय दुःख ओढवलें, तें तरि मीं समजुं कशी
"पाहिन ते चरण कधीं" लागे मनिं ध्यास सदा
राहति ना सोडुनि मज गृहिं असल्या पळहि कदा
"दिपवाळिस आवश्यक येतो गे" ह्मणुनि असें
मज कथिलें, उलट परी वागति ते आज कसें ?
'खाउ देइं' 'खाउ देइ' म्हणुनि पोर रडत तयां
काय देउं आणुनिया वस्तु बये ! कोठुनियां ?
फों फों फों करुनि नित्य मोटर ये दारिं जरी !
प्राणनाथ नसति त्यांत शोधुं कुठें काय तरी ?

---

# लोक वेडे कीं मी वेडा ?

साकी

मनांत मौजा करित बसे मी, एक्या ठायीं बसुनी
केव्हां पळतों, उठतों, केव्हां राही स्वस्थ निजोनी १
मिचकावी मी डोळे केव्हां, तोंड वांकडें करुनी
बघे भूमितें, आकाशीं कधिं, केव्हां भोंवतिं फिरुनी २
तनुवरि कधिं मी राख फांसुनी, मस्तकिं फेंकी माती
गडबड दावुनि बडबड करि मी, चिंध्या धरितों दांतीं ३
गोमय घेवुनि मुखावरी मीं लावी केव्हां काळें
स्वातंत्र्याचें माझ्या भोंवतिं मीच पसरवी जाळें ४
गृह माझें मी, धन मी माझें, भार्या माझी मीच
अधिकारी श्रीमंत असे मी, दरिद्रि, पाजी, नीच ५
खाया कधिं मज मिळें, कधीं ना मिळे तदा उपवासी
देवो कोणी, कुणी न देवो मागें तरि न कुणासी ६
स्वराज्य माझें माझ्या हातीं, राजा मीच मनाचा
प्रजा माझि मी, मजवरि ताबा नसे कधीं कोणाचा ७
स्वतंत्रतेचें सौख्य भोगितों, सदा मुदें राहोनी
मनास येई तेवीं वर्तन करी खुशाल बसोनी ८
पुसता नच कुणि, शास्ता कोणी जगामधीं मज नाहीं
स्वतंत्र मी, मज तिळभरि नाहीं पराधीनता कांहीं ९
लंगोटी कधिं लावी तनुवरि, कधीं नग्न मी फिरतों
पर्वा नच मज या जगताची, स्वानंदें मी असतों १०

कधिं योग्यासम बसुनी राही, बघुनि स्थल एकांत
संतसाधुसम मनांत राही कधीं कधीं मी शांत ११
"वेड्या सम कां वागसि" ह्मणुनी उपमा माझी देती
परि मजलागीं उपमा नाहीं अन्य कुणाची जगतीं १२

* * *

ऐसें असुनी पराधीन जन "वेडा वेडा" ह्मणुनी
मजला छळिती रात्रंदिन ते निज धंद्यासीं त्यजुनी १३
उगीच बसतां कुठें तरी मीं भोंवतिं जमती लोक
मांसपिंड तो देखुनियां जणुं, धांवति सन्निध काक १४
मार्गानें मी चाले तरि जन धांवुनि येती वेगें
खडे मारिती मम तनुवरती, पळती माझ्या मागें १५
जेवायातें बसलों असतां त्यांत फेंकिती 'माती'
ऊंस खाउनी स्वतां, टाकिती 'चिवट्या' माझ्यावरती १६
जसें करी मी तसेंच करिती माझ्यासम कित्येक
मज चिडवीती 'वेडा' ह्मणुनी थोर सानही लोक १७
येतां जातां मारिति कोणी देती बुक्या लाथा
निजलों असतां पाय ठेविती कितीक माझ्या माथां १८

* * *

अद्भुत ऐसा प्रकार पाहुनि नवलचि मातें गमतें
लोक शहाणे, बनती कां मग ? मूर्खचि माझ्या सम ते १९
मद्वंधुनों ! विचार याचा करा तुम्हीं स्वमनांत
"मी वेडा कीं, जन हे वेडे" असती या जगतांत २०

* * *

" वेड्या मागें वेडे बनुनी स्वकार्य टाकुनि जावें–"
दत्तकिंकरा योग्य न गमतें, ऐसें हें वागावें ! २१

---

## भगिनी–स्मरण

पद (चाल—चंद्रकांत०)

गेली गेली भगिनी आतां, कसली दिपवाळी ।
हौसें येउनि कोण मला या समयीं ओवाळी ॥ धृ० ॥

सौभाग्याचें निशाण केवळ " कुंकुम " तें भाळीं ।
प्रारब्धानें मिळें तशी ती लेत चीर चोळी ॥ १ ॥

सद्गुणि, मोदें निज संसारीं दक्ष सदा राही ।
आज्ञा पतिची मोडि न कधिंही सुखें वसे गेहीं ॥ २ ॥

नच मिळती जरि गरिबीपायीं वसनें कधिं भारी ।
नाहिं दागिना ह्मणुनि करी कधिं कोप न संसारीं ॥ ३ ॥

निज दैवानें मिळेल त्यांतचि राही संतुष्ट ।
रुष्ट कधीं ना, धैर्य धरोनी करी बहुत कष्ट ॥ ४ ॥

साधी राहणि, संभावितपण शोभा दे तिजला ।
नटवेपण नच इष्ट भासतें " आर्या गृहिणीला " ॥ ५ ॥

स्वभाव किति तरि शांत जियेचा, करि न कधीं क्रोध ।
जिला पाहुनी इतर नारिनीं ध्यावा जणुं बोध ॥ ६ ॥

वेळीं झाली हानि आपुली तरि सोशी तीतें ।
परी भांडणें काढुनि देई शिव्या न कवणातें ॥ ७ ॥

गरिवी घरची, परी भिकारी द्वारीं जो येई ।
  संतोषानें, घडेल तितुकें दान तया देई ॥ ८ ॥

सुदैवगतिनें तिजला झालीं पुढें मुलें चार ।
  पाहुनि त्यांना प्रपंचिं राही आनंदें फार ॥ ९ ॥

सासू, भावे, थोर माणसें, यांचा बहु मान ।
  ठेवी, साध्वी धरी कधीं नच वृथाचि अभिमान ॥ १० ॥

लीनपणानें वागुनि, सर्वां मधुर बोल बोले ।
  स्त्रियास भूषण "लीनपणा" यासम भगिनी चाले ॥ ११ ॥

घडें न कांहीं मला घ्यावया तिला वस्त्र भारी[1] ।
  दिपवाळीची चोळी मिळतां, तीच ह्मणे भारी[2] ॥ १२ ॥

तिच्या घरीं मीं जातां कितितरि व्हावा मोद तिला ।
  " कोठें ठेवूं कुठें न ठेवूं " असें करी मजला ॥ १३ ॥

गृहीं असें जें त्यांतचि थोडें, बहु करि पक्वान्न ।
  " भाऊराया ! गोड करी बा ! गरिवीचें अन्न " ॥ १४ ॥

वदे असें जंव अमूल्य वाटे तेव्हां जेवण तें ।
  मिळेल आतां तिच्या करींचें काय हाय ! मातें ॥ १५ ॥

" प्रेमाची ती भाजी—भाकर मधुर खरी गमते । "
  " निष्प्रेमाची शिरापुरीही विषापरी बनते " ॥ १६ ॥

देवा ! आतां कुठें पाहुं मीं माझ्या भगिनीला ? ।
  मातेसम जी थोर गमे मज, तया इंदिरेला ॥ १७ ॥

---

१ उंची २ फार.

प्लेगोबानें धाड घालुनी अभागि मज केलें ।
मृत्युसमयिं तव मुखावलोकन बाई ! नच घडलें ! ॥ १८ ॥

कंटाळा कां भगिनी माझा, आला तुजलागीं ।
ह्मणुनि काय गे ! सर्वां सोडुनि पळसि पुढें वेगीं ॥ १९ ॥

बाई ! तुजला निज पुत्रांची दया न कां आली ।
'आई' कोणा म्हणतिल, त्यांना कोण जेउं घाली ? ॥ २० ॥

तव विरहानें वृद्ध जननितें दुःख बहुत झालें ।
रात्रंदिन तें मारी तिजला उरीं शिरीं भाले ॥ २१ ॥

हाय ! हाय ! रे ! देवा ! कैसा घात असा केला ? ।
कुठें करूं मीं शोध, कुठुनियां आणूं भगिनीला ॥ २२ ॥

काळा ! कैसा निष्ठुर होउनि मम भगिनी नेसी ।
गरीब जाणुनि चहूंकडोनी दुःख मला देसी ॥ २३ ॥

कुणा करें मीं आतां घेवूं ओंवाळुनि सदनीं ।
ओवाळणि मीं देउं कुणातें? मानुं कुणा भगिनी ॥ २४ ॥

गोड कसें मी ताटांतील हें मानूं पक्वान्न ।
विषाप्रमाणें मला आज हें वाटें मिष्टान्न ॥ २५ ॥

सत्तेची ती गेली कोणा भगिनि गणूं कैसी ? ।
निज धन जावुनि ल्यास, यावी करीं भीक जैसी ॥ २६ ॥

* * *

कळलें देवा ! दुःख कशास्तव भगिनीचें दिधलें ।
दृष्टि व्यापक मीं ठेवावी ऐसें त्वां कथिलें ॥ २७ ॥

एका कामिनिवांचुनि जगतीं अवघ्या युवतींसी ।
भगिनीसम त्यां मानि ह्मणोनी दिलें दुःख मजशीं ॥ २८ ॥

जें जें करितो परमेश्वर तें योग्य करीं ह्मणुनी ।
दत्तकिंकरें समाधान हें मानियलें स्वमनीं ॥ २९ ॥

---

# सुशिक्षितांची डोळेझांक.

( शार्दूलविक्रीडित )

झाला देश, भणंग दीन, दुबळा, अन्नान्न झाली दशा !
"त्यागावी परदेशि वस्तु" ह्मणुनी दावीत लोकां दिशा !
तंबाखू नि विडया न ओढुनि धना, जे वांचवा सांगती
डोळे झांकुनियां "पुढारि" परि ते "तंबाखुतें" सेविती १

आर्यांग्लादिक वैद्यशास्त्र बघती आरोग्य राखावया
तंबाखूविषयीं जनांस कथिती ना योग्य सेवावया !
"नेकोटीन" जलाल वीष भरलें त्यामाजि जे सांगती !
डोळे झांकुनि "वैद्य, डॉक्टर" हि ते "तंबाखुतें" सेविती ! २

शास्त्र, ग्रंथ, पुराण, वेद शिकुनी मोठेपणा पावती !
वागावें तुम्हि शास्त्र–युक्त ह्मणुनी लोकांस जे सांगती !
डोळे झांकुनि 'शास्त्रि' तेच उलटे "तंबाखुतें" सेविती !
झाले अंधचि दत्तकिंकर वदे हे लोक कां संप्रती ? ३

---

# विडीचें कृष्णकृत्य !

शा. वि.

बुद्धिभ्रष्ट, शरीरिं कुष्ट करुनी, जी ओष्ठ काळे करी
भासे मिष्टचि, वीर्य नष्ट करि पैं, हो पुष्ट कोणी जरी
होती कष्ट, न गोष्ट इष्ट ह्मणुनी, जी शिष्ट ना सेविती
सांगे स्पष्टचि दत्तकिंकर विडी ही दुष्ट आहे अती १
कंठीं पाश जया पडेल विडिचा, तन्नाश होई खरा
होतो श्वास घशास, कांस हृदयीं, देहास येते जरा
तेवीं ऱ्हास धनास खास करिते, दुर्गंधि तोंडास ये
घेतां कां करिं दत्तकिंकर वदे वेश्येस ऐशा स्वयें ? २

---

# शुक–रंभा–संवाद !

( अर्वाचीन )

[ निर्व्यसनी शुकदेवास, आपल्या ताब्यांत ओढण्याचा–व्यसनी बनविण्याचा–विडीरंभा पुष्कळ प्रयत्न करिते; पण निश्चयी शुकदेव तिच्या आत्मप्रशंसात्मक मोहक भाषणाला न भुलतां, गाईचें दूधच तुझ्यापेक्षां श्रेष्ठ आहे असें तिला सांगतो. आणि शेवटीं त्याचा निर्व्यसनीं राहण्याचा बळकट निश्चय पाहून विडीरंभा तेथून पळून जाते. असें कथानक यांत गोंविलें आहे. ]

**विडीरंभा—** ( शा. वि. )

आहे ख्याति सदा मदीय जगिं या शोधोनियां पाहतां
जागोजागिं मिळे मलाच बहुधा सन्मान तो तत्त्वतां
नाहीं श्रेष्ठपणा कुणा मजपुढें वास्तव्य सर्वां करीं
ऐशा या विडि–सुंदरीस त्यजि जो तो व्यर्थ या भूवरी १

शुकदेव— ( शा. वि. )

कैंचा श्रेष्ठपणा तुझा, तुजहुनी गे ! श्रेष्ठ धेनू असे
जीचें दुग्ध जणूं सुधाच ह्मणवी, जीवास रक्षीतसें
ऐशा धेनु–पयास टाकुनि कुणी सेवील जो कां तुला !
त्यानें जन्म वृथाच हा दवडिला येवोनिया भूतला २

विडीरंभा— ( मालिनी )

निजगृहिं कुणि येतां पाहुणा, त्या पुढारी—
मजसि करिति, आसा तोष मी देइ भारी
मजविण शुभ कार्यीं, आदरातिथ्य नाहीं
ह्मणुनि जगिं मला जो सेविना व्यर्थ पाही ३

शुकदेव— ( मालिनी )

मनुज जगतिं घेतो जन्म ज्या वेळिं त्याला
प्रथम पय हवें तें धेनुचें प्यावयाला
महति ह्मणुनि आहे धेनु–दुग्धा–मृताची
नच समज धरी, त्या व्यर्थ फेरी जिवाची ४

विडीरंभा— ( दिंडी )

कुणिहि सन्निध जो मजसि घेइ हौसें
त्यास रमवाया दक्ष सदा बैसें
डुलवि, झुलवी, मोहवी, गुंगवीतें
मजसि टाकुनि मग काय सौख्य होतें ? ५

शुकदेव— ( दिंडी )

तुझ्या योगें कफ, पित्त, फार होतें
शक्ति सारी हळुहळूं लया जाते

रक्त दूषित होतें, न कळे त्यातें
दुग्ध–पानें परि शक्ति फार येते

मराठी ग्रंथ संग्रह

**विडीरंभा–** ( द्रुतविलंबित )

मजसि जो करिं घेइल एकदां
सतत मी प्रिय भासत त्या सदा
त्यजुनि सौख्य नि चैन उगी कदा
बुध कुणी नच भोगिति आपदा ७

**शुकदेव—** ( द्रु. वि. )

मनुज गोरस–पान करी सदा
तरि टळे तनुची खरि आपदा
त्यजुनि हेम कुणी जरि कोळसा–
करिं धरी तरि सत्यचि तो पिसा ८

**विडीरंभा—** ( द्रु. वि. )

तरुण वृद्धहि जे मज देखती
भुलुनि माळ गळां मम घालिती
जरि मदीय सुसंगति टाळिती
फुकट जन्म असे तरि त्याप्रती ९

**शुकदेव—** ( द्रु. वि. )

बघुनि दुर्जन तें तुज भाळती
बुध कुणी नच सन्निध वांच्छिती
त्यजुनि धेनु–पया तुज घे करीं
खचित मूर्ख गमें मज भूवरीं १०

**विडीरंभा—** ( स्रग्धरा )

साधू ते थोर मोठे बहुत जपि, तपी ध्यान जे लावितात
शास्त्री, शास्त्रें पुराणें पढुनि दिननिशीं भाविका भोंदितात
तेंवी बी. ए. नि एम्. ए. शिकुनि सतत जे प्रौढितें दावितात
ते सारे लुब्ध होती, मजसि बघुनियां, ऐशि ही माझि मात ११

**शुकदेव—** ( दिंडी )

जगीं वागति जे गर्दभासमान
तेच ठेविति गे ! तुझा सदा मान
धेनु—दुग्धामृत टाकुनी विषाचा—
करी आश्रय जो, व्यर्थ जन्म त्याचा १२

**विडीरंभा—** ( दिंडी. )

असो कोठेंही भुवनिं, वनीं, रानीं
सदा येतां जातांहि मला कोणी—
जवळ घेउनियां हौस फेडितात
जन्म त्यांचें तें सफल या जगांत १३

**शुकदेव—** ( दिंडी )

धेनु—दुग्धाची महति असे फार
धेनु—वंदन तें करिति थोर थोर
काम—धेनू प्रत्यक्ष पय तियेचें
जरि त्यागी तरि विफल जिणें त्याचें १४

**विडीरंभा—** ( दिंडी )

यज्ञ—मंडपिं वा लग्न—मंडपांत
मौंजिबंधन नी सभा, उत्सवांत

मला मिळतो सन्मान कुठेंही तो
मजसि सोडी तज्जन्म विफल होतो १५

**शुकदेव—** ( दिंडी )

मृत्युलोकीं धेनूच खरी माय
जिच्या दुग्धानें जगति[1] मनुज-काय
दुग्ध-पानीं ना रमें चित्त ज्याचें
व्यर्थ होतें जन्मणें जगीं त्याचें

**विडीरंभा—** ( शा. वि. )

त्यागोनी धन लक्ष, कोटि करिती, सत्कार माझा सदा
व्यापारी जन नित्यही मिळविती, माझ्यामुळें फायदा
लाखो चाकर पोट नित्य भरिती माझ्याच सेवेमुळें
माझा त्याग करोनि लाभ सहसा कोणा न कांहीं मिळें १७

**शुकदेव—** ( शा. वि. )

होते हानि जगीं अगाध तुझिया पायीं वृथा जारिणी !
नाहीं लाज तुला कितीक तरुणां त्वां टाकिलें जाळुनी
झाले लोक अनेक कालवश ही खों खों करोनी अती
ऐसी निंद्यचि तूं, न लाभ कवणा लाभे तुझ्या संगतीं १८

**विडीरंभा—** ( शा. वि. )

नाहीं जारिणी मी सदा करितसे लोकोपकारा अती
जाळोनी तनुतें स्वतां, सुखविते मीं अन्य लोकांप्रती
आहे कोण जगीं स्वयें मरुनियां, जो लोकसेवा करी ?
ऐसी ख्याति असोनि जो त्यजि मला तो मूर्ख या भूवरी १९

---

१ मनुष्याची शरीरें जगतात.

**विडीरंभा—** ( स्रग्धरा )

साधू ते थोर मोठे बहुत जपि, तपी ध्यान जे लावितात
शास्त्री, शास्त्रें पुराणें पढुनि दिननिशीं भाविका भोंदितात
तेंवी बी. ए. नि एम्. ए. शिकुनि सतत जे प्रौढितें दावितात
ते सारे लुब्ध होती, मजसि बघुनियां, ऐशि ही माझि मात ११

**शुकदेव—** ( दिंडी )

जगीं वागति जे गर्दभासमान
तेच ठेविति गे ! तुझा सदा मान
धेनु—दुग्धामृत टाकुनी विषाचा—
करी आश्रय जो, व्यर्थ जन्म त्याचा १२

**विडीरंभा—** ( दिंडी. )

असो कोठेंही भुवनिं, वनीं, रानीं
सदा येतां जातांहि मला कोणी—
जवळ घेउनियां हौस फेडितात
जन्म त्यांचें तें सफल या जगांत १३

**शुकदेव—** ( दिंडी )

धेनु—दुग्धाची महति असे फार
धेनु—वंदन तें करिति थोर थोर
काम—धेनू प्रत्यक्ष पय तियेचें
जरि त्यागी तरि विफल जिणें त्याचें १४

**विडीरंभा—** ( दिंडी )

यज्ञ—मंडपिं वा लग्न—मंडपांत
मौंजिबंधन नी सभा, उत्सवांत

मला मिळतो सन्मान कुठेंही तो
मजसि सोडी तज्जन्म विफल होतो १५

**शुकदेव—** ( दिंडी )

मृत्युलोकीं धेनूच खरी माय
जिच्या दुग्धानें जगति[1] मनुज–काय
दुग्ध–पानीं ना रमें चित्त ज्याचें
व्यर्थ होतें जन्मणें जगीं त्याचें

**विडीरंभा—** ( शा. वि. )

त्यागोनी धन लक्ष, कोटि करिती, सत्कार माझा सदा
व्यापारी जन नित्यही मिळविती, माझ्यामुळें फायदा
लाखो चाकर पोट नित्त्य भरिती माझ्याच सेवेमुळें
माझा त्याग करोनि लाभ सहसा कोणा न कांहीं मिळें १७

**शुकदेव—** ( शा. वि. )

होते हानि जगीं अगाध तुझिया पायीं वृथा जारिणी !
नाहीं लाज तुला कितीक तरुणां त्वां टाकिलें जाळुनी
झाले लोक अनेक कालवश ही खों खों करोनी अती
ऐसी निंद्यचि तूं, न लाभ कवणा लाभे तुझ्या संगतीं १८

**विडीरंभा—** ( शा. वि. )

नाहीं जारिणी मी सदा करितसे लोकोपकारा अती
जाळोनी तनुतें स्वतां, सुखविते मीं अन्य लोकांप्रती
आहे कोण जगीं स्वयें मरुनियां, जो लोकसेवा करी ?
ऐसी ख्याति असोनि जो त्यजि मला तो मूर्ख या भूवरी १९

---

१ मनुष्याची शरीरें जगतात.

शुकदेव— ( शा. वि. )

धेनू धन्य जगीं जिला सुर–मुनी त्रैलोक्यही वंदिती
देवोनी निज दुग्ध जी सुखविते सर्वत्र लोकांप्रती
नाहीं अन्य जगांत या तिजविणें कल्याणकर्त्री खरी
ऐशा माउलिची बरोबरी तुला येईल कैसी तरी ? २०

विडीरंभा— ( दिंडी )

‘ पुण्य जितुकें शत–धेनु करुनि दान
अधिक आहे त्याहुनि मदीय पान’
वचन ऐसें सर्वत्र बोलतात
मला सोडुनि करि कोण आत्म–घात २१

शुकदेव— ( दिंडी )

असें पातक जें करुनि तुझें पान
तया पापासम, पाप नसें आन
जरी कोणी शत–धेनु करी दान
तरी जाई नच पाप तें धुवून २२

विडीरंभा— ( दिंडी )

एक वेळां कुणि करि मदीय पान
तीर्थ–मज्जनिंचे पुण्य तया जाण
जगीं विलसे सत्कीर्ति थोर माझी
अभागी तो नर होइ मज न राजी २३

शुकदेव— ( दिंडी )

संगतींनें तव पाप बहुत होतें
शत–स्नानें केलीं न तरी जातें

निंद्य ऐसें तव जिणें या जगांत
तुला वरितो तो स्वयें करी घात २४

**विडीरंभा—** शा. वि.

वा: वा: वा: तुजला कळे न किमपी माझी खरी योग्यता
भोळा होसि खराच गा ! मनुज तूं अज्ञानि रे ? तत्त्वतां
तूंतें फॅशन आजची नच कळे तूं शुद्ध रे ! रानटी
मातें त्यागुनि लाभ काय मिळतो ? तूं सांग रे ! शेवटीं २५

**शुकदेव—** शा. वि.

जा जा जा इथुनी निघोनि सटवे ! तूं निंद्य गे ! जारिणी
एका चुंबन देउनी फसविसी अन्यास कैदासिणी
मी नाहीं भुलणार गे ! तुज कधीं मत्प्राणही गेलिया
दावी तूं नच, नीच कृष्णवदना, राहूं नको ठायिं या २६

**विडीरंभा—** ( शा. वि- )

हां हां हां असले अभद्र वच हें बोलूं नको तूं उगी
होसी सात्विक, शांत, निश्चयि खरा तूं धन्य साधू जगीं
झालासी वश ना मुळीं ह्मणुनि मी जाते निघोनी परी—
माझी तूं अपकीर्ति ना पसरवी कोठें हि या भूवरी २७

**शुकदेव—** ( शा. वि. )

संगे घेवुनि फॅशनेस निघुनी जा आंग्ल देशामधीं
काळें तूं करी येथुनी, न भुलवी मद्बांधवांतें कधीं
ना राही मम भारतीं, जरि अशा ना मानिशी हेतुला
शिक्षेतें तरी दत्तकिंकर करें देईल, सांगें तुला २८

---

# धेनु आणि धूम्रपान.

पद—( चाल–चंद्रकांत० )

हिंदू बांधव जन हे! कृति कशि, उफराटी करिती
पुण्य पथातें सोडुनि हौसें, पाप मार्ग धरिती १
हिरा टाकुनी गारगोटि करिं संतोषें घेती
कल्पतरू टाकुनी बाभळी मोदें गृहिं नेती २
ज्ञानी हितकर बोध कथी त्या त्वरें दूर करिती
गप्पाष्टकि बहु पाखंडयातें सन्निद्ध बाळगिती ३
अमर करी जी सुधा परि तिला फेंकुनिया देती
मद्यविषा जणुं गोड मानुनी प्राशन जन करिती ४
त्याचपरी या गोरस–पाना धिक्कारुन सदनीं
तंबाखूचा धूर ओढिती रात्रंदिन वदनीं ५
गोरस–पानें रोग जाउनी शक्ति बहुत येते
विड्या ओढुनी निज देहातें श्वास, पित्त होतें ६
गोदुग्धामृत धर्मशास्त्रिं बहु पवित्रसें ठरतें
धूम्रपान हें अयोग्य ‘अतिशय निंद्य’ जगीं दिसतें ७
ऐसें असुनी धेनुरक्षणीं लक्ष्यही न देती
द्रव्याचा व्यय विडीकारणें लक्षावधि करिती ८
धेनूपुढती चारा, द्याया ‘कर मळतो’ म्हणती
घाणीची जणुं मूस अशी ती चिलीम करिं धरिती ९
गोपृष्ठावरि कर फिरवाया लज्जा मनिं वाटे
गांजा हस्तें चोळितांच जणुं मोक्ष खचित भेटे १०

गोशाळेमधिं जातां नाका घाण येत म्हणती
विडया फुंकितां घाण कुठें त्यावेळीं पळविती ११

गोमातेसी स्नान घालितां कंटाळा करिती
चिलीम, छापी हौसेनें मग करें कशी धूती १२

एक धेनुही पाळायासी द्रव्य नसे ह्मणती
विडी, चिरुट घ्यावया निशिदिनीं कसें येत हातीं १३

गायरान तें एक इंच ना शेतांतुनि देती
पेराया परि तंबाखूशीं शेतें गुंतविती १४

धेनू बांधायासी वेळीं झोंपडी न करिती
तंबाखूचा सांठा करण्या ‘वखार’ बांधविती १५

‘गोग्रासा’स्तव भीक मागतां लाज गमे चित्तीं
विडीतमाखूस्तव परि खुषिनें हस्ता पसरीती १६

धेनू–पोषण सोडुन रक्षण चिलमीचें करिती
अविचाराचीं निंद्य अशीं हीं कृत्यें जन करिती १७

योग्य नसें हें भारतियानों ! हिंदू धर्मासी
धूम्रपान सोडुनी करा तुम्हि गोरस–पानासी १८

स्वधर्म–पालन, धेनू–रक्षण, व्हावें नेमानें
आस अशी ही ‘दत्तकिंकरा’ पुरवावी सुजनें १९

---

# विडीचा वेडा !

पद ( चाल–विठाबाई माउली० )

चित्तचि गेलें जडुन, तुजवरि, चित्तचि गेलें जडुन  धृ०
घडिभरि जरि तूं सन्निध नसतां, भानचि जातें उडुन
त्वां मज मोहिनि घातलि कैसी? नये खचित ती कळुन
वेडा बनलों त्वत्प्रेमानें, रिझविसि मन्मन बघुन
तन, मन, धन, हें अर्पियलें तुज, दूर न राही रुसुन
येतां, जातां, उठतां, बसतां, निघे न मन तुजवरुन
नव नवरूपें नटुनी येतां, जातों त्याला भुलुन
घडिघडि चुंबन घ्यावें वाटे, जन निंदेतें त्यजुन
कुणीहि कांहीं ह्मणोत जरि मज, सोडि न तरि तुज चुकुन
विसर तुझा गे ! होइल तेव्हां, जाइन जंव मी मरुन
प्रियकरणी ! तूं हृत्पटलावरि, बोल ठेवि हे लिहुन

*  *  *

यापरि कितितरि विषय कर्दमीं, लोळति वेडे बनुन
दत्तकिंकरा ! ऐशा वेड्यापासुनि राही जपुन

# प्रणय-भंग.

[ एका सद्‌गृहस्थाच्या सांगण्यावरून विडीसुंदरीचा त्याग केलेल्या पतीस विडीसुंदरीची प्रार्थना ]

पद ( चाल-अजि अक्रूर हा० )

कां त्रास असा नाथा ! माझा आला
अन्याय कोणता झाला  ध्रु०

नवयौवनिं मी दृष्टिस तुमच्या पडलें
तेंव्हांच तुम्हीं मज वरिलें
नच घडलासे वियोग कधिही अपुला
मग आज कोप कां आला ?
चाल-कां सेवेमधिं मीं चुकलें ?
मुखचुंबनिं अंतर पडलें ?
ह्मणुनि कां तुह्मांतें मुकलें ?
नच कळतें हो ! काय पातला घाला
मम उरीं घातला भाला ! कां०  १

अति करिति कुणी प्रीति कामिनीवरती
दुर्जना न बघवे चित्तीं
ते देउनियां सल्ला भलती सलती
संसारिं घालितीं माती
जनरीति अशी नीच तुह्मां कां पटली ?
प्रेमाची सरिता अटली !
चाल-मी स्वयें भुवनिं वनिं रानीं

अति कष्ट सदा भोगोनी
ही कोमल तनु जाळोनी
नित पांघरिला प्रणयसुखाचा शेला
परि न्यायचि उलटा केला ! कां० २
जंव जडली ही प्रीति सख्या हो ! तुमची
ठेविलि न लाज लोकांची
घरिं, दारिं, सदा येतां, जातां, बसतां
शय्येवरि लोळत असतां
तुम्हि सभेमधीं असतां कोर्टामाजी
तेथेंहि ठेविलें राजी
चाल–सुखवाया तुमच्या चित्ता
निशिदिनीं ठेवि तत्परता
करिं थयथय नाचे नाथा !
कां बोध तुम्हां दत्तकिंकरें केला ?
ह्मणुनियां रंग पालटला ! कां० ३

---

## निरोप.

[ विडी सुंदरीचें दुर्वर्तन पाहून तिचा पति तिला शेवटचा निरोप देतो. ]

( झंपा )

अगे ! जारिणी ! जाइ तूं त्वरित निघुनी
कोप येतो मनीं तुजसि बघुनी ध्रु०
लोभ बहु दाविसी वरिवरी तूं मशीं
मलिन परि मानसीं येइ कळुनी १

आजवरि फसविलें मजसि सटवे ! खुळे !
खचित मन मोहिलें प्रेम करुनी २

मूर्ख कैदासिनी ! दुष्ट तूं पापिणी
त्यजिलि तनु जाळुनी जवळ बसुनी ३

त्वद्गुणा देखुनी वीट येतो मनीं
कृष्ण मुख घेउनी जाइ इथुनी ४

हौस पुरवावया धनहि गेलें लया
गोष्ट गत झालिया काय कथुनी ? ५

पुनरपी तूं मशीं जरि कुठें भेटसी
दत्तकिंकर तुशीं लावि पळुनी ६

---

## सदा चहा प्यावा ?

**पद** ( चाल—चंद्रकांत )

अशक्त बनणें असेल तरि तुह्मिं " सदा चहा प्यावा "
लौकर जाणें जरी जगांतुन, तरी " चहा प्यावा "
निर्धन बनणें योग्य गमें, तरि " सदा चहा प्यावा "
निद्रा-सुख तें नको तुह्मांतें ? तरी " चहा प्यावा "
गमतें दुर्बल संतति व्हावी, तरी " चहा प्यावा "
गमें स्वबांधव दुःखित व्हावें, तरी " चहा प्यावा "
देश दरिद्री व्हावा वाटें, तरी " चहा प्यावा "
टॅनिन विष जरि उदरिं ओतणें, तरी " चहा प्यावा "

पचन–कार्य निज विघडुनि घ्यावें गमें, " चहा घ्यावा "
' अग्निमांद्य ' हा रोग जडावा गमें, " चहा घ्यावा "
व्यर्थ जडावें ' व्यसन ' इष्ट तरि " सदा चहा घ्यावा "
मेंदु स्वताचा बिघडुनि घ्यावा गमें, " चहा घ्यावा "
स्मरण–शक्ति निज लयास जावी गमें " चहा घ्यावा "
दंत–भग्नता लौकर यावी गमें " चहा घ्यावा "
या बोधाचा क्रोध वाटतो तरी " चहा घ्यावा "
दत्तकिंकरा योग्य न गमतें कधिंहि " चहा घ्यावा "

---

## माझें सामर्थ्य.

( शा. वि. )

जो कोणी मजला करीं धरितसें अत्यादरें वंदुनी
सेवा शांतपणें करी, बहु मुदें प्रेमें मनीं जाणुनी
त्यातें मीं जगतीं सदा बसविते नेवोनि सौख्य–स्थलीं
देवोनी बहु संपदा, बुडविते दुःखें तयांचीं जलीं १

माझी किर्ति विशाल भूवरि सदा, सत्ता तशी गाजते
कोठेंही न सुराज्य या महिवरी माझेविना चालतें
राहो रंक, असो नृपाल अथवा, मातें सदा आदरी
टाळी जो मज, त्या कुणीहि न पुसे ज्ञानी जनांभीतरीं २

झाले ख्यात कवीहि, लेखक बहू माझ्याच सत्तेमुळें
माझा आश्रय सर्वदा करित जो दारिद्र्य त्याचें टळें
श्री ज्ञानेश्वर-एकनाथ-कृतिही माझ्याच योगें कळे
श्री दासें निज ' दासबोध ' लिहिला माझ्याच साह्यामुळें ३

झाले ग्रंथ अमोल जे विविध ते सारेहि माझ्या बळें
राज्याचा इतिहासही पडतसे दृष्टीस माझ्या बळें
न्यायाचें नित कार्य चालत पहा सृष्टींत माझ्या बळें
मित्रांचें सुखदु:खही कळतसें, सर्वांस माझ्या बळें ४

जे जे थोर जगामध्यें **टिळक** वा **शास्त्री**[1], **खरे**, **गो**खले
**गां**धी, **दा**स नि **रा**नडे, **वि**पिन वा **वै**द्यादि **ला**ला भले
तेवीं जे इतिहास–भक्त असती, भू–पृष्ठ भागीं कुणी
ते सारे अति वैभवास चढले मातें करीं घेउनी ५

राज्य स्थापितसे शिवाजि नृप तों साह्यें असीच्या परी
त्याचें ही अति गुप्त कार्य अवघें माझ्याच होतें शिरीं
खड्गांची कृति, रक्तपात, वध ही माहीत आहे जनां
माझें कार्य परी सुखावह सदा आनंददायी मना ६

घे जो बाळपणीं करीं मजसि त्या श्रेष्ठत्व देती, परी—
लोटी दूर बळें तयास वदती " ठोंव्या " जगाभीतरीं
" यासाठीं मज घेइ तूं निजकरीं " ऐसी वदे लेखणी
आज्ञा ऐकुनि **द**त्तकिंकर तिच्या सेवेस लागे झणीं ७

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. नि. ११८८

1 विष्णुशास्त्री चिपळूणकर.

# मोठा कोण ?

( शा. वि. )

द्रव्याचा निधि थोर सन्निध, तरी
मोठा न तो होतसे
शक्तीनें जरि मत्तही कुणि असो,
मोठा न तो होतसे
सत्ता थोर जरी नृपा करिं तरी,
मोठा न तो होतसे
विद्यामंडितही असो कुणि परी,
मोठा न तो होतसे १

सत्कार्यीं धन वेंचितो, निज बळें–
दुष्टास संहारितो
सत्तायुक्त असोनि जो निज जना,
पुत्रापरी पाळितो
विद्या–दान सदा करोनि विनयें,
लोकोपकारा करी
" मोठा तो " जगिं " दत्तकिंकर " वदे
जो " राष्ट्रसेवा " वरी २

# खंदा धर्मवीर !

( शा. वि. )

ज्याला या जगिं जन्म पूर्व नियमें देशांत ज्या लाभला
तेवीं ज्या कुळिं पातला, तदुपरी धर्मांत ज्या वाढला
घेई ज्या गृहिं जन्म ज्या जननिच्या पोटीं सुखें येतसे
त्यांचें रक्षणिं देह हा झिजविणें 'कर्तव्य' ज्यातें दिसें १

वाटे ज्या स्वमनीं 'स्वभूमि' जननी, ज्या 'धर्म' भासे पिता
सद्बंधू 'सुविचार,' 'नीति' भगिनी मानीतसे तत्वतां
सन्मार्गीं रत आपुलें कुल जसें, देखोनि चाले तसें
धर्मज्ञान जसें स्वधर्मिं कथिलें, तें वंद्य मानीतसे २

धर्मप्रेम धरी 'अधर्म' अवघा त्यागी विचारें सदा
कोणी कांहिं वदो तया जरि तरी प्रेमा ढळेना कदा
रक्षाया 'निज धर्म' ज्या कितिहि तीं येवोत विघ्नें तरी
त्यांची खंति न बाळगी लवभरी, कर्तव्य मोदें करी ३

आहे जें जवळीं पुन्हां मिळवितां आतां पुढें मेळवी
तें सारें धन जाउनी पुढति त्या दारिद्र्यही त्रासवी
खाया अन्न जरी प्रसंगिं नसतां खंती नसे ज्या मनीं
धर्माचार कधींच ना त्यजित जो सौख्या वृथा मानुनी ४

ज्याचें लक्ष्य सदा स्वधर्मिं, असतां ऐशी तया ये घडी
देहा वस्त्रहि फाटकें नच मिळे किंवा नसे झोंपडी
"धर्मत्याग करीं" ह्मणोनि छळितो शत्रू जरी त्याप्रती
सोडीना कधिंहि 'स्वधर्म' सहसा ज्याची चळोनी मती ५

धर्मभ्रष्ट करावया विषयिं त्या मोही कुणी सुंदरी
प्रेमा दावुनि वेगडी वरिवरी " रंभा–शुकाचें परी
घाली तीस न भीक जो तिळभरी, धर्मा न सोडी कदा
जावो प्राण तरी ' स्वधर्मिं ' रत तो कैसीहि ये आपदा ६

दावोनी कुणि यास आमिष अती देई धनातें जरी
प्रेमानें कुरवाळुनी ह्मणतसे, 'धर्मांतरा तूं करीं,'
मारी लाथ तया धनास बघुनी तो गुंतवीना मना
" धर्माच्या पुढतीं महत्त्व नच दे धर्माभिमानी धना " ७

धर्मत्याग करावया जरि बळें संत्रस्त कोणी करी
छातीठोकपणें उभा पुढतिं त्या घेई मिठी दो करीं
शत्रूंशीं समरांगणीं झगडतां झाला जरी जर्जर
सोडी प्राण, परी ' स्वधर्म ' सहसा त्यागी न खंदा नर ८

' माझा स्वीकरिं धर्म ' भूपहि जरी प्रत्यक्ष त्याला वदे
ना मानी धरि हट्ट फार तरि त्या शिक्षा जरी पूर्ण दे
शस्त्रें भोंवतिं ठेविलीं जरि तया कारागृहीं घालुनी
खंदा वीर गडी ' विधर्म ' सहसा स्वीकारि ना त्रासुनी ९

विद्या इंग्लिश वा जपान, रशिया, तुर्की, इटाली, जरी
या भाषा शिकुनी पुढें बसतसे बी. ए. मधीं त्यापरी
होई पास तदा शिके नव कला विद्वान हो अंतरीं
सोडीना ' निज धर्म ' जो जगतिं या राहो कुठेंही तरी १०

दैवें प्राप्त जरी तयास चढणें ज्वालामुखी पर्वत
मोठें संकट ये तरी अढळ जो धैर्यें सदा वर्तत

ठेवो कोणि वनीं न जीवन जिथें ऐशा गिरीकंदरीं
मानी ' भोग ' परी ' स्वधर्म ' नच जो सोडी सबाह्यांतरीं ११

रक्षाया निज धर्म ज्यापरि सदा बाजी, शिवाजी गडी
संभाजी बहु शूर वीर समरीं घेती प्रसंगीं उडी
तेविं प्राणहि देत निर्भयपणें धर्मास रक्षावया
" धर्मात्मे, परका न धर्म वरिती स्वप्राणही गेलिया " १२

तन्मार्गांत पदोपदीं जरि पहा शस्त्रें उभीं रोविलीं
पुष्पांची मृदु शेज मानित असें मातें हरीनें दिली
खंदा वीर कुणी असा वसत जो लोकाग्रणी भारतीं
भावें वंदन 'दत्तकिंकर' करी अत्यादरें त्याप्रती १३

---

## आर्य-गृहिणी !

**पद** ( चाल-दशरथ स्त्री वचनें )

साध्वी गृहिणी तीच खरी
स्वपतिविना जी अन्य नरातें, मानी बंधुपरी
पतिपद-सेवा नित्य करी
पति हें दैवत, पति तो गुरु, पति मानी तोच हरी
प्रिय पति दुःखित होय जरी
सर्वेंचि दुःखी होउनि आपण पतिसम कार्य करी
जंव तो आनंदास वरी
हास्य-वदन तंव करुनि पतीचे, प्रेमें चरण धरी

प्रिय पति क्रोधाविष्ट जरी
प्रत्युत्तर ना देई कधिंही; मानसिं मौन वरी
प्रिय पति दारिद्र्यार्त जरी
खेद न त्याचा असें गृहीं जें त्यांत प्रपंच करी
नगाची हौस मनांत पुरी
परि नच मिळतां प्रारब्धानें किमपि न दुःख करी
जी पतिवचना श्रवण करी
" हें नलगें कधिं " " तें व्हावें मज " हट्ट असा न धरी
दैवें जें जें मिळत घरीं
स्वीकारी तें आनंदानें दुःख मुळीं न करी
कुमार्ग–सेवनिं राहि दुरी
पतीसवें जी लीनपणाचें वर्तन नित्य करी
पतिकार्यातें साह्य करी
स्वधर्म समजुनि " पतिसेवा " करि " गृहिणी " तीच खरी
मद्भगिनीनों ! सौख्य जरी–
हवें तुह्मांतें; या मार्गाविण मार्ग न अन्य तरी
यापरि पतिव्रता नारी
दत्तकिंकरा दिसे जगीं जी, तीतें नमन करी १

# भिकारीण.

[ एक श्रीमंत गृहस्थ, दारावर आलेल्या तरुण व सुंदर भिकारणीस पाहून तिच्यावर मोहित झाला. ही एक भिकारीण व मी मोठा श्रीमंत, या अभिमानामुळें "तिला आपण सहज वश करूं" असें त्यास वाटलें. पण ती खरी पतिव्रता स्त्री असल्यामुळें तिनें त्याच्या दारांत प्राण दिला पण ती त्यास वश झाली नाहीं. हें कथानक यांत गोविलें आहे. ]

**श्रीमंत**—( दारावर आलेल्या तरुण भिकारणीस पाहून )

स्वागता.

सुंदरी ! दिससि तूं सकुमार
कोण गे ! कुठलि हें कथि सार
आंत ये उघडिं सत्वर दार
लुब्धलें मन तुझ्यावरि फार १

भिकारीण—एकटी दुबळि मी धनहीन
भीक मागत फिरे अति दीन
जाहल्यें जगतिं या पतिहीन
पोट ना भरत होउनि शीण २

श्रीमंत—कासया उगिच भोगिसि ताप
संपलें समज गे ! तव पाप
राहिं तूं मम गृहीं सुख फार
कांहिं ना तुज कमी पडणार ३

भिकारीण—जो मिळे विधि-लिखें पति तोच !
पत्नि पाळित सुखें पति तोच !

त्याविणें इतर ते अपकारी
भासती वरुनि जे उपकारी ४

श्रीमंत—मी नसे नर दुज्या सम खोटा
सद्गुणी, धनिक, सुंदर, मोठा
वैभवा नच उणें मज कांहीं
हौस तूं सकल फेडुनि घेईं ५

भिकारीण—सद्गुणी निज मुखें वदतोस !
"पापकृत्य" मग कां वरतोस ?
नाहिं कां तव गृहीं निज भार्या ?
मार्ग कां सरळ सोडिसि आर्या ? ६

श्रीमंत—मद्गृहीं तरुण, सुंदर जाया—
राहते परि तुझी नव काया
पाहुनी मन अनावर होतें
सत्वरी जुळविं तूं नव नातें ७

भिकारीण—घालिना मन अशा विषयांत
राज्य तूं करि सुखें स्वगृहांत
प्रीति ना करि दुज्या युवतीची
प्रार्थना तुज अशी गरिबीची ८

श्रीमंत—तूं गरीब ह्मणुनी तव माया—
येतसे, विनति ना करि वायां
फाटकें वसन सत्वर टाकीं
घेइं नूतन सखे ! तनु झांकीं ९

भिकारीण——श्रीहरि मजसि जें नित देत
मानितें सतत तोषचि त्यांत
" जे जगीं वसति पाळुनि नीति
तेच शेंवटिं खरे सुखि होती १०

श्रीमंत——दागिने नच तुझ्या शरिरास
कंकणें हि मिळती न करास
हौस फेडुनि सये ! झणिं घेईं
भूषणें नि वसनें नव लेईं ११

भिकारीण——भूषणें सजविती न तनूस
" नीति " भूषण खरें युवतीस
" नाशवंत शरिरा नटणें हें "
" कार्य सद्‌गृहिणिचें कधि नोहें " १२

श्रीमंत——जन्म घेवुनि जगीं मनुजाचा
इंद्रिया न सुखवीं, तरि त्याचा-
व्यर्थ जन्म ठरतो युवती गे !
कामना पुरविं तूं मजसंगें १३

भिकारीण——इंद्रियां सुखविणें निज कार्य
मानिती न कुणि सज्जन आर्य
जन्मुनी जगिं हरी भजणें हें
मानवा खचित भूषण आहे १४

श्रीमंत——वेद भारुड कथा नलगे गे !
येइ तूं स्वखुषिनें मजसंगें

ना तरी तुजसि सोडिन आतां
भोगितों समज देउनि लाता १५

भिकारीण—साहसा नच अशा करुं आर्या !
येइ ना यश मुळीं तव कार्या
वांच्छिती नर जरी परदारा
अंतिं तेच मुकती घरदारा १६

श्रीमंत—नाश होइ जरि त्या नच भीतों
कांहि हो परी तुला गृहिं नेतों
वाढिलें पुढतिं, टाकुनि ताट
कोण मागिल पुसे वहिवाट ? १७

भिकारीण—रावणादिक कसें मृत होती ?
चंद्र तेविं मिळवी अपकीर्ति
पाहुनी घडत जो इतिहास
न स्वयें करुनि घे उपहास १८

श्रीमंत—शब्द जो निज मुखें वदतों मी
तो कधीं न करितोंच निकामी
तूं पळून जरि जाशिल आतां
आणितों धरुनि मारुनि लाता १९

भिकारीण—निर्धनी बघुनि ना करि जोर
जाण तूं स्वसदनीं बहु थोर
"गर्व"ना करित शेवट गोड
वासना अशि अमंगल सोड २०

श्रीमंत—हां ! नको बरळुं तूं मुळिं आतां
ओढिती धरुनिया तव हाता
पाहतों मग कसें करिशील ?
तूं मला नच जरी वरिशील २१

* * *

बोलुनी वच असें वदनानें
सव्य हस्त धरिला स्वकरानें
लागतां कर तनूस तयाचा
तो प्रसंग भिडला निकराचा २२
क्रोध ती करित होउनि लाल—
बोलली "करिशि तूं जरि हाल"
भोगिशील परि हें अघ दुष्टा !
हो तुझें न बरवें कधिं नष्टा ! २३

* * *

शाप देउनि तया अधमाला
घेतसे धडक ती दगडाला
रक्त वाहत फुटें मुख—खंड
जाहली पति—नता तंव थंड २४

* * *

ज्या सती पतिनता असतात
त्यास दुष्ट जरि ते छळितात
हाल सोसुनि तिथें मरतात
अंतिं ना परि कुणा वरितात २५

पाहतां जगिं किती धनवंत
निर्धना छ्ळुनि वाहति अंत
गांजिती धनबळें युवतींना
राहतो लव विवेक न त्यांना २६
नीतिहीन बहु या धनिकांत
पापकृत्य जगतीं करितात
हो ! स हो ! जन तया वदतात
"दत्तकिंकर" वदे खरि मात २७

---

## बळी तो कान पिळी !

पद ( चाल–फटक्याची )

निर्बल–मूषक देखूनि, बोका बळी तयाचा कान पिळी
मांजर बलहिन बघुनि, तियेचा कान पिळी तो श्वान बळी १
दीन बापुडें हरिण देखुनी, व्याघ्र तयाचा घात करी
दुबळी बेडुक, ह्मणोनि तीतें सर्प धरितसे मुखांतरीं २
कंठ धेनुचा चरचर चिरितो कसाब बलवंतचि ह्मणुनी
'भुजंग' निर्बल पाहुनि त्यावरि गरुड घालितो झडप झणीं ३
सिंह घालितो उडी कुंजरावरी हीन बळ देखोनी
'काळ' घेतसे ग्रास सर्वदा दुर्बल पाहोनी प्राणी ४
अशींच दृश्यें अनेक जगतीं "बळी असे तो कान पिळी"
जगांत जगणें असेल ज्यासी, व्हावें त्यानें सदा बळी ५
दत्तकिंकरां ! दुबळ्या, वेड्या ! कष्टी राहूं नको कदा
बनसिल जेव्हां बळी तेधवां "यशस्वि" होशिल जगीं सदा ६

---

# मना ! नको तो अभिमान !

पद—( चाल फटक्याची )

तुला वाटतें मीच शहाणा, व्यर्थ गर्व हा वाहुं नको
अनेक असती भूवरि पंडित, दोष कुणातें लावुं नको १

तुला वाटतें मीच धनिक परि, धनाढ्य जगतीं बहु थोर
तुझें द्रव्य तें किती गुलामा ! उगीच करिशी बडिवार २

तुला वाटतें मीच देखणा सुंदर आहे जगांतरीं
मिचके डोळे, रंगहि काळा, गर्व कशाचा सांग तरी ? ३

तुला वाटतें मीच कवी हा कविता करितों निशीदिनीं
तेजस्वी बहु रवीसारखे थोर कवी रे! तुझ्याहुनी ४

लेखक, वक्ता, ग्रंथकार मी ह्मणोनि धरिसी अभिमान
सूर्यापुढतीं खद्योतचि तूं कोण देइं रे ! तुज मान ? ५

एकाहुनि ते एक थोर या जगीं खरोखर असति जन
दत्तकिंकरा सुपथ दावि तूं "मना ! नको तो अभिमान" ६

---

# यत्न–महति.

दिंडी.

पाहिजे कां ? ‘ धन ’ जरी प्रपंचास
तेविं व्हावी जगिं “ कीर्ति ” अशी आस
गमे ‘ विद्या ’ येउनी ‘ श्रेष्ठ ’ व्हावें
प्रयत्नानें तरि साध्य हें करावें १

वृथा दैवावरि ठेवुनी हवाला
कोण भूवरि या श्रेष्ठ असें झाला ?
चणे लोहाचे कठिण खाय जेव्हां
मनुज नाचे तो ब्रह्मपदीं तेव्हां २

दिसत नेत्रीं जी आज आगगाडी
तेविं यंत्रें नव दिसति काय थोडीं ?
सागरीं ज्या चालती आगबोटी
प्रयत्नांची कृति होय सान, मोठी ! ३

प्रयत्नानें उदयास बहुत आले
कनिष्ठांचे कित्येक थोर झाले
टिळक, किर्लोस्कर, रानड्यादि वीर
प्रयत्नानें मिळविती भाग्य थोर ४

पुढाऱ्यांनीं [1]येथील यत्न केला
चालुं झाली " आख्यान–रत्न–माला "
पुढें येई " मंदार–विहग–माला "
प्रयत्नांचें नच दृश्य काय बोला ? ५

जया वाटे जगीं " भाग्यवंत " व्हावें
प्रयत्नातें तरि निशिदिनीं करावें
त्यजुनि " आळस " ' उद्योग शिरिं धरावा
दत्तकिंकर विनतीस मान द्यावा ६

---

१ नांदेड येथील.

# व्यर्थ तो !

पद—( चाल नृपममता रामावरती )

नरदेहिं जन्म घेवोनी
नच पाहि ब्रह्म जो नयनीं व्यर्थ तो !
कर्तव्य मुख्य तें असुनी
ना स्मरे ईश जो ध्यानीं व्यर्थ तो !
निज देहा धरुनि स्वार्थ-
वेंचि ना देशसेवेंत व्यर्थ तो !
मिळवी न कदा ज्ञानाला
अज्ञान-पंकिं जो रुतला व्यर्थ तो !
संपदा, असुनी गृहिं सदा, धर्म ना कदा करी जो
कोणी, करी जो कोणी; नच पाहि ब्रह्म० व्यर्थ तो ! १

विद्या न कला लव शिकला
निज धर्मि न तिळभरि रतला व्यर्थ तो !
उपकार न ज्यानें केला
करि साह्य न जो दीनाला व्यर्थ तो !
विषयांतचि रंगुनि गेला
उन्मत्त मदानें झाला ! व्यर्थ तो !
खायास-काळ ! भूमीस-भार ! नांवास पात्र या कोणी !
पात्र या कोणी, नच पाहि० व्यर्थ तो ! २

कधिं संता नम्र न झाला
मानी न ईश-भक्तीला व्यर्थ तो !

धैर्य ना प्रसंगीं ज्याला
जो सदा बघे स्वार्थाला व्यर्थ तो !
कर्तव्य कळेना ज्याला
जो गणी न सत्कर्माला व्यर्थ तो !
श्रीवरा ! दत्तकिंकरा, व्यर्थ पामरा, करी नच ह्मणुनी
करी नच म्हणुनी, प्रार्थना प्रभो ! तव चरणीं, येधवां २

---

## पुष्पा !

[ श्रीक्षेत्र काशी येथील गंगाजलावरील तरंगत्या पुष्पास उद्देशून ]

पद ( चाल—चंद्रकांत० )

परोपकारी, पुण्यशील जगिं पुष्पा ! तूं असती !
सुगुण बळानें श्रीविश्वेश्वर–मस्तकिं तूं वससी १
ज्याचें दर्शन दुर्लभ गमतें आह्मां मनुजांस
त्याच शिवाच्या शिरीं होतसे नित्य तुझा वास २
द्रव्य वेंचुनी आम्ही येथें कष्टानें येतों ।
परी सदोदित विश्वेशाचा सुसंग तुज घडतो ! ३
पद, नख, आह्मां दृष्टि न पडतें, ज्या शिवरायाचें !
नयनमनोहर भूषण होसी त्याच्या कंठाचें ४
निर्माल्याच्या मिषें तुला जरि दूर करी देव
तरि मौजेनें पोहसि पाहुनि गंगेचा ठाव ५
स्नान एकदां तरी घडावें ह्मणुनी जन फार
तळमळ करिती बघावयातें भागिरथी–तीर ६
तरीहि केवळ दैवबळानें गंगास्नान घडे
परी लाभ त्या स्नानाचा तुज, नित्यचि पदरिं पडे ७

इतरांना तूं सौख्य देउनी, स्वयें सौख्य बघसी
पुण्यशील नच कसें ह्मणावें ? खरा थोर असमी ८

* * *

‘ सद्गुण ’ निज बल दावुनि इतरां उपकारचि करणें
दत्तकिंकरा, योग्य वाटला बोध असा घेणें ९

ग्रंथ संग्रहा

---

## श्रेष्ठत्वाचा मार्ग !

( शा. वि. )

रूपें सुंदर, ठेंगणी, तरुणशी
प्रत्यक्ष स्वर्गांगना
देखोनी पर कामिनीस शिवतें
ना पाप ज्याच्या मना
एकांतीं कुणि सांपडे जरि सती
तीतें न जो भाळतो
श्रेष्ठत्वाप्रति “दत्तकिंकर” वदे
तो या जगीं पावतो १

लोकांचें धन ये करीं अनितिनें
त्यातें न जो का वरी
सोडी सत्य न जो कदापि समयीं
हानीहि झाली तरी
घालोनी निज आयु तें जनहिता,
जो नीतिनें वागतो
श्रेष्ठत्वाप्रति “दत्तकिंकर” वदे
तो या जगीं पावतो २

---

# कोण कशानें तरला ?

पद ( चाल—फटक्याची )

" भगवद्भक्ति " हीच मानवा, तरणोपाया अवतरली
' भक्ति-पथानें बहु जन तरले हरिनें केली सोय भली १
भक्ति नवविधा मार्ग निराळे, ज्या ज्या दिसली सोय जशी
त्या मार्गें ते तरुनी गेले सार्थक करुनी अवनीसी २
' काम '—प्रेमें हरि वश केला गोपीकांनीं गोकुळिंच्या
दैत्यराज तो कंसहि तरला भीतीनें श्रीकृष्णाच्या ३
' शरीरसंबंधानें, पांडव, अर्जुनादि वीरहि तरले
' ममत्व ' मोहें वसुदेवादिक देवकि जन ते उद्धरले ४
' सेवा ' करुनी लक्ष्मी तेवीं गरुड मारुती हे तरले
' हरिगुणलीला श्रवण करोनी परीक्षिती जन उद्धरले ५
वंदन करुनी भावभक्तिनें सुभक्त अक्रूरहि तरला
कवित्व करुनी श्रीरामाचें वाल्मीकि मुनि उद्धरला ६
आत्मज्ञानें जडभरतादिहि निज रूपामाजी रमले
उपासनादि व्रतें करुनियां रुक्मांगद ते उद्धरले ७
सगुण भक्तिनें तुकारामही ज्ञानेश्वर नी नाथ, भले-
परोपकारें दामाजी, जनि, भजन करूनी उद्धरले ८
अगणित ऐसे प्राणी तरले, मार्ग साधला ज्यास जसा
त्या त्या मार्गें भक्तिबळानें ' नरहरि ' केला अपुलासा ९
श्रीदत्ता ! या " दत्तकिंकरा " प्रेमा दे तुज वंदाया
सुमार्ग दावुनि उद्धरि मजला, जाऊं दे नच जगिं वायां १०

---

# काळाचे बोल !

[ दासबोधांतर्गत ]

( भु. प्र. )

किती थोर आशा असे या जिवाची
जगीं पाहतां दुष्कृती ही जनांची
न लागे घडी ही जगासी त्यजाया
परी भ्रांतिमाजी पडे प्राणि वायां १

त्यजूनी फुकाचें प्रभू नाम—सत्य
भवाचीच चिंता करी नित्य नित्य
सदा द्रव्य ठेवी तिजोऱ्या भरोनी
मला देखतांची निघे त्या त्यजोनी २

मला श्री हरीचीच आज्ञा ह्मणोनी
करीं कार्य नामी प्रवासा निघोनी
त्वरें आणितों बांधुनी मी जिवातें
असें सोंपिलें कार्य हें थोर मातें ३

असो तो जगीं थोर वा सान कोणी
अति क्रूर, झुंजार वा उग्र मानी
प्रतापी, असो शूर संग्राम—काळीं
तरी त्यास नेतो दुपारीं, सकाळीं ४

ह्मणें मी न हा शास्त्रि, कीं ब्रह्मवेत्ता
सदाचार—संपन्न वा थोर दाता

पुराणीक, व्याख्यानकर्ता नि जोशी
कुणी अन्नदाना करी, आप्त पोशी ५

ह्मणेना असे ख्यात हा रूपशाली
मुका, आंधळा, यन्मती मंद झाली
कुणी पांगळा, हस्त ना पाद कांहीं
कधींही तयांची दया येत नाहीं ६

जरी अग्निहोत्री, पुरामंत्रि, यंत्री
असो रोगि वा रागि, भोगीहि तंत्री
कुणी ताल जाणें, कुणी काव्य जाणें
कुणी सिद्ध वा साधु कोणी शहाणें ७

असो तत्ववेत्ता तसा वेदवेत्ता
कुणातें कळे अंतरीं, गुप्त वार्ता
समाधिस्थ, कोपी असो शान्त कोणी
तयासी न सोडी, अशी माझि वाणी ८

तपस्वी हरीदास वा राजयोगी
कवी, भाट, राहो पराधीन, जोगी
स्वदेशी, विदेशी न पाही कुणाला
जिथें सांपडे जो तिथें नेइ त्याला ९

न मानी खरा वा असो कोणि खोटा
असे यौवनीं वा वयानेंहि मोठा
उपाशी भुकेनें असो दीन पोर
तयासी त्यजीना कुणी गुप्त हेर १०

बहू दांडगा शक्ति ठेवी गजाची
वसे नित्य सेना असंख्यात ज्याची
दरिद्री, कुणी शूर वा वीर कोणी
तरी नेइ त्याला जरी तो न मानी ११

किती जीव कोटीस नेतो जिवेंशी
पशु, श्वान, शार्दूल किंवा हयासी
तसे काक, हंसा, पिकातें खगाशीं
त्वरें नेइ मी देह टाकोनि त्यांसी १२

कुणी शस्त्रधारी कुणी द्वैतवादी
कुणी ब्रह्मचारी, कुणी तर्कवादी
असो भूपती जो जगीं चक्रवर्ती
तयाही न सोडी, अशी माझि भीति १३

कुणी दुष्ट, चांडाळ हो शक्तिमान्
कुणी मत्त, वेडा, बली दैन्यवान्
कुणी विप्र, कोणी धनानें कुबेर
कुणी आळशी, धर्म तो रक्षिणार १४

कुणी पापि, कोणी शिपायी कुणाचा
तसा पास बी. ए. कुणी होत साचा
असो डॉक्टरी, वैद्यकी जाणता तो
तयालागिं घेवोनिया नित्य जातों १५

कुणी न्यायकर्ता गुणीही असो तो
असंख्यात मी जीव घेवोनि जातों

मला नोळखी, अज्ञ आहेच कोण ?
जगीं जन्मला त्या सदा नेइ जाण १६

" तनु त्यागितां कीर्ति मागें उरावी "
अशी बुद्धि तूं मानवा ! आदरावी
जरी वाटतें, " जन्म आतां न व्हावा "
तरी संतसंगें हरी आठवावा १७

* * *

असा मृत्युचा हा असे बोध सत्य
धरी मानसीं जो स्मरें " दत्त " नित्य
तरी भीति त्यातें शिवेना यमाची
विभो ! लाज रक्षीं तुझ्या किंकराची १८

REFBK-0004488

दत्ताकिंकरकृत

# सन्मार्ग-दर्शक-पुस्तक-मालेचीं

## उपयुक्त पुस्तकें.

या मालेंतून विविध विषयांवरील स्वतंत्र पुस्तकें प्रसिद्ध होत असतात. निजाम स्टेटमधील, स्वतंत्र विषयांवरील पुस्तकें प्रसिद्ध करणारी हीच पहिली माला होय. फक्त चार आणे प्रवेश फी भरून नांवें नोंदविणारास आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या व पुढें प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकास पाऊणपट किंमत पडेल! आतांपर्यंत छापून प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें पुढें दिलीं आहेत.

### (१) श्रीतुकाराममहाराज येहेळेगांवकर यांचें सचित्र चरित्र

आपल्या योगसामर्थ्याच्या बळावर कित्येक अद्भुत चमत्कारांनीं जगास थक्क करून सोडणाऱ्या व ब्रह्मज्ञानोपदेशानें खऱ्या शाश्वत सुखाचा लाभ करून देणाऱ्या, अत्यंत ज्ञानी व सामर्थ्यवान् अशा सत्पुरुषाचें चरित्र प्रत्येकानें अवश्य वाचण्यास योग्य आहे. किंमत अवघी ४ आणे.

### ( २ ) श्री शारदा स्तोत्र !

हिंदुधर्मीय मुलांनीं विद्याप्राप्तीसाठीं नित्य पाठांत ठेवण्यास हें स्तोत्र फारच सुलभ करुणरसानें ओथंबलेलें, फारच योग्य आहे. सार्वजनिक उत्सवप्रसंगीं मुलांना बक्षिस देण्यास उत्तम. किंमत अवघी दोन आणे.

### ( ३ ) धूम्रपान निषेध-पद्यावलि !

तंबाखू अर्थात् विड्या, सिगारेट इत्यादि ओढण्यापासून शारीरिक, आर्थिक, व धार्मिक दृष्टीनें केवढी भयंकर नुकसानी आहे याविषयीं यांत माहिती सांगून, या व्यसनापासून परावृत्त होण्यासाठीं जनतेंतील प्रत्येक वर्गास विनति केली आहे. सार्वजनिक गणेशोत्सवांत यांतील पदें मुलांना शिकविण्यास फारच परिणामकारक आहेत. किंमत तीन आणे.

### ( ४ ) मुंबईची मौज !

आजपावेतों मुंबई ज्यांनीं पाहिलीच नसेल त्यांस घरीं बसूनच मुंबईत काय काय प्रेक्षणीय मौज आहे हें या पुस्तकावरून समजून

येऊन क्षणभर मनाची करमणूकहि होईल! यांतील वर्णन कटावद्वारें असल्यामुळें वाचतांना देखील फारच मौज वाटते! किंमत अवघी दोन आणे.

## ( ५ ) श्री गोदाष्टक.

नित्यशः स्नानाचे वेळीं म्हणावयास प्रार्थनापर योग्य अष्टक. किंमत एक आणा.

## ( ६ ) श्रीसद्गुरु-भजनामृत.

श्री. महाजनांच्या प्रेमळ पयासह. यांत श्रीगुरु मारुतिमहाराज तेरकर रामदासी यांच्या स्तवनपर पदें, अष्टकें, आरत्या, धांवे इत्यादि फारच उत्तम असून महाराजांचा फोटोहि यांत दिला आहे. महाराजांच्या शिष्यमंडळींनींच काय पण सर्वच गुरुपुत्रांनीं यांतील पदें नित्यशः पाठांत ठेवण्यायोग्य आहेत. किंमत अवघी चार आणे.

## ( ७ ) श्री म्हाळसा-कृपामृत.

श्रीम्हाळसादेवीवरील स्तवनपर अष्टकें, पदें, स्तोत्र इ. करुणापर फारच योग्य पुस्तक प्रत्येक देवीभक्तांनीं संग्रहीं ठेवावें. किंमत अवघी दोन आणे.

## ( ८ ) वैश्य त्रिकाल संध्या.

वैश्य मंडळींना नित्यशः उपयोगी. किंमत अवघी तीन आणे.

## ( ९ ) विड्यांचें कृष्णकृत्य.

या दोन श्लोकांचा मोठ्या अक्षरांचा बोर्ड बैठकींत लावून ठेवल्यास त्यांच्या अवलोकनानें विड्या, सिगारेटचें व्यसन खात्रीनें सुटेल. किंमत अवघी एक आणा.

प्रत्येक पुस्तकास टपाल व्ही. पी. खर्च वेगळा पडेल. एकाच पुस्तकाची एकच प्रत मागविणें असेल तर पोस्टाचीं तिकिटें पाठविणें. व्ही. पी. नें खर्च जास्त येईल.

वरील पुस्तकांशिवाय कोणतींहि शालोपयोगी पुस्तकें, श्रीदत्त प्रेसचीं पुस्तकें, संत दासगणू महाराजांचीं पुस्तकेंहि आमचेकडे मिळतील. कोणत्याहि पुस्तकांच्या प्रती घेणारांनीं पत्रद्वारें खुलासा करून घेणें म्हणजे स्वस्त भावांत पुस्तकें देऊं. पत्ता:—**गणेश अनंत सराफ.**
श्रीदत्त प्रेस, मोंढा बाजार, मु. नांदेड. पो. नांदेड ( निजाम स्टेट. )